

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय का॰वा॰
दा. क्र. 2038
B BK-0402037

# ...मही के. ग्रँट ...उठे आहात?

भा. रा. भागवत

वाचनालय
२०३६
९४१४८४२
क्र. 2036 : १७७१६६
विषय ९११-वी क्र. . . . .

कुमारांसाठी ज्यूल व्हर्न कादंबरीमाला : ३

# कॅप्टन ग्रँट तुम्ही कुठे आहात ?

अनुवाद

भा. रा. भागवत

BVBK-0402037

राजा प्रकाशन

प्रकाशक
सौ. शुभदा मुळे
राजा प्रकाशन
सी/८, इंद्रावदन सोसायटी
पद्माबाई ठक्कर रोड
माहीम, मुंबई ४०० ०१६

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

प्रकाशन क्रमांक : ६२

© भा. रा. भागवत

प्रथमावृत्ती
३१ ऑगस्ट १९८६

मुखपृष्ठ
अनंत सालकर

आंतील चित्रे
विजय कदम

मूल्य बारा रुपये

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | कॅप्टन ग्रँटची मुलंही आली | ५ |
| २ | पायी मोर्चा सुरू | १३ |
| ३ | पॅगानेल म्हणतो ' सर्वच चुकलं ' | २३ |
| ४ | ' बूमरँग ! ' | ३२ |
| ५ | ' मॅक्वायर ' बोटीवर | ४३ |
| ६ | कैदेतून सुटका | ४९ |
| ७ | आयर्टनची कबुली | ५६ |
| ८ | अखेर बाबा भेटले | ६० |

म. गं. सं. ... शाखा.
क्र. २०३६ M.M.L.G.
विषय

१

# कॅप्टन ग्रँटची मुलंही आली

' मासा ! बाप रे ! केवढा प्रचंड मासा ! – हा नक्की व्हेल असणार ' डोलकाठीवर चढलेला टेहेळ्या हे ओरडला आणि लगेच तो ज्या दिशेला बोट दाखवीत होता, तिकडे जहाज वळवण्यात आले. सर्वांची एकच गडबड उडाली.

१८६४ सालातली ती जुलैची २६ तारीख होती. इंग्लंडहून निघालेली ' डंकन ' ही अलिशान आगबोट आता भूमध्य समुद्रात प्रवेश करणार होती, तोच हा आरडाओरडा झाला.

व्हेलची शिकार करायला मिळणार म्हणून उल्हसित झालेले प्रवासी डेकच्या कठड्याकडे धावले. मासा जवळ आला तेव्हा तो व्हेल नसून एक टोलेजंगी शार्क आहे असे खलाश्यांच्या लक्षात आले. या मत्स्यराजाने समुद्रात विलक्षण खळबळ माजवली होती. त्यामुळे हार्पून फेकण्यात कुशल असलेल्या खलाशांनाही त्याची शिकार करणे कठीण गेले. पण अखेरीस हजाजाखालचे पाणी बरेच रक्ताळल्यानंतर तो गतप्राण झाला. त्याचे

अवाढव्य शरीर वर ओढून घेण्यात आले आणि लगेच त्याच्या कत्तलीला सुरुवात झाली.

दरम्यान बोटीचे तरुण मालक लॉर्ड एडवर्ड ग्लेनरव्हान आपल्या नववधूसह कॅबिनकडे परतले. लॉर्डसाहेबांचा ष जन्मच श्रीमंत स्कॉटिश घराण्यातला आणि आत्ता लग्नानंतर भरपूर प्रवासाचा आनंद मिळावा म्हणून त्यांनी ही आगबोट विकत घेतली होती. बरोबर बोटीच्या खलाश्यांखेरीज लॉर्डसाहेबांचा एक मामेभाऊ होता—लष्करी अधिकारी मेजर मॅकनॅब्स.

डेकवर येताच न येताच तोच एक खलाशी ओरडत आला, 'साहेब ! शार्कच्या पोटात ही बाटली सापडली !'

'बाटली ?' ती हातात घेऊन मालक उद्गारले. 'शाम्पेनची बाटली ? आणि तीही रिकामी नाही'—भरलेली ! चांगली जड लागतेय !—मद्याने भरलेल्या बाटल्या फेकून देणारे खलाशी औरच म्हटले पाहिजेत !' आणि तो एक गडी अजून पोहतोय कशाला ? — अरे, वर ये ! ही बाटली तरी रिकामी करू या !'

बाटलीला वरून खूप खवले चिकटलेले होते. कालवं नि शिंपले ! ते खरवडून काढताना खलाश्यांच्या नाकी नऊ आले. पण अखेरीस बाटली उघडली.

'आत दारू नाही. दुसरंच काही आहे ! — कागद ! चोळामोळा झालेला कागद ! — पाहू ?'

सरदारसाहेबांनी तो मिठाने चिकट झालेला ओला कागद फार जपून बाहेर काढला आणि उलगडला. हस्ताक्षरात लिहिलेली ती एक चिठ्ठीच होती. पण बऱ्याच काळापूर्वी लिहिलेली असावी. त्यामुळे काही अक्षरे ( कंसातली ) पुसट बनली होती, तर काही दिसेनाशी झाली होती. तरी पण तर्कबुद्धी चालवून तो सर्व मजकूर लावण्यात मंडळींना अखेर यश मिळाले.

लॉर्ड एडवर्डनी चिठ्ठी वाचली ती अशी—

'७ जून १८६४ रोजी ब्रिटानिया जहाज पॅटागोनियालगत खडकात रुतले. कॅप्टन ग्रँट आणि दोन खलाशी होडीतून किनाऱ्याकडे निघाले आहेत. पण तिथे ते जंगली ( इंडियनांचे ) कैदी बनणार. ऑस्ट्रल (   ) ३७° ११' अक्षांशावर ही बाटली त्यांनी फेकली आहे. तिचा उपयोग झाला तरच ते वाचण्याची शक्यता. नाहीतर सर्व मामला खतम !'

'ऑस्ट्रल याचा अर्थ दक्षिण.' लॉर्डसाहेबांनी सर्वांसाठी खुलासा केला.

'कॅप्टन ग्रँट ! आपल्या देशातला प्रख्यात भूसंशोधक !' मेजर मॅकनॅब्स उद्गारला. 'दोन-अडीच वर्षं झाली त्याला बेपत्ता झाल्याला ! आता जिवंत तरी असतील का हे कॅप्टनसाहेब ?'

'काही असलं तरी आपण त्यांचा शोध घेतलाच पाहिजे.' लॉर्ड एडवर्ड म्हणाले. त्यांनी आपल्या कप्तानाला सांगून बोट इंग्लंडकडे वळवून घेतली. बंदरात उतरल्याबरोबर त्यांनी पत्नीला नि भावाला आपल्या 'माल्कम कॅसल' किल्ल्याकडे रवाना केले आणि स्वतः प्रमुख इंग्रजी वृत्तपत्रांना तारा केल्या. 'गायब झालेली ब्रिटानिया बोट आणि कॅप्टन ग्रँट यांच्याबद्दल माहिती हवी असेल तर स्कॉटलंडमधील लस् गावच्या माल्कम कॅसलशी संपर्क साधा.' एवढे करून लॉर्डसाहेब आरमारी अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी लंडनला रवाना झाले.

ते परत येण्याच्या आधीच दोन व्यक्ती त्यांच्या पत्नीला भेटायला आल्या. एक तरुण मुलगी अन् एक युवक.

'मी रॉबर्ट ग्रँट.' तो युवक म्हणाला, 'आणि ही माझी बहीण मेरी ग्रँट. आम्ही कॅप्टन ग्रँटची मुलं आहोत. आमचे वडील जिवंत असणार असं आमचं मन आम्हांला सांगतं.'

लेडी हेलन चकित झाली. पण लगेच तिने त्यांचे अगत्याने स्वागत केले; आणि 'माझे यजमान परत येईस्तो तुम्ही आमचे पाहुणे म्हणून राहा' म्हणून आग्रह केला. दोघांनी हे आमंत्रण आनंदाने स्वीकारले.

हेलनला त्यांच्याकडून जी हकीकत कळली ती अशी : या मुलांची आई त्यांच्या लहानपणीच वारली होती. पुढे त्यांच्या आत्याने त्यांना वाढवले. पण कॅ. ग्रँट बेपत्ता झाल्यानंतर थोड्याच दिवसांत ती आत्याही वारली. मुले कॉलेजचे शिक्षण संभाळून कशीबशी चरितार्थ चालवीत होती. आपल्या वडिलांचे काय झाले असेल या चिंतेने मात्र त्यांना कायमचे ग्रासले होते.

लॉर्डसाहेब दुसऱ्याच दिवशी लंडनहून परतले. ते आले ते त्रागा करीतच आले—

' हे आरमारखातं आहे की मूर्खांचा बाजार आहे ? इतकं सगळं सांगूनसुद्धा कॅप्टन ग्रँटसाठी बोट उचलायला तयार नाहीत ! नालायक घरकोंबडे कुठचे ! '

' आई ग ! ' मेरीच्या तोंडून केविलवाणा उद्‌गार निघाला.

बैठकीच्या खोलीत दुसरे कुणी असेल अशी लॉर्डसाहेबांना आतापर्यंत कल्पनाच नव्हती. चपापून त्यांनी आपल्या या पाहुण्यांकडे पाहिले.

हेलनने लगेच सर्व खुलासा केला अन् पाहुण्यांची ओळख करून दिली.

' ओः ! ' लॉर्डसाहेब उद्‌गारले. ' बिच्चारी पोरं ! '

' आरमारखातं शीड गुंडाळून बसणार असेल तर .. ' हेलन जोषात म्हणाली, ' आपण जाऊ या कॅप्टन ग्रँटच्या शोधाला ! या मुलांना घेऊन. '

' शाबास हेलन ! आणि असं करू...या खेपेस भूमध्य समुद्र वगैरे काही नको...पॅटागोनियाचा उल्लेख होता ना बाटलीतल्या चिठ्ठीत ? मग आपण सरळ केप हॉर्नच गाठू या. ' ( दक्षिण अमेरिकेचे टोक म्हणजे केप हॉर्न भूशिर. तिथेच आग्नेय भागात कुठेतरी पॅटागोनिया नावाचा देश आहे आणि त्या देशात राक्षसी उंचीचे लोक राहतात अशी पूर्वी वदन्ता होती. )

त्याप्रमाणे बेत नक्की झाला आणि भरपूर शिधासामग्री नि शस्त्रे यांनी सज्ज होऊन ' डंकन ' कॅप्टन मँगल्सच्या नेतृत्वाखाली दक्षिण अमेरिकेकडे

निघाली. तिने इतरही काही उतारू बरोबर घेतले होते.

पहिल्याच दिवशी आमच्या प्रवाशांना अंमळ वादळी हवेला तोंड द्यावे लागले. पण एकाच दिवसात वातावरण निवळले. दुसऱ्या दिवशी मेजर मॅकनॅब्स डेकच्या कठड्याला टेकून पाईप ओढीत उभा होता. तेव्हा एका जरा विचित्र उतारूने त्याचे लक्ष वेधून घेतले. चाळीस एक वर्षे वयाचा किडकिडीत गृहस्थ. डोक्याला चौकड्यांची कौंटी कॅप अन् अंगात सफारी पद्धतीचा कोट. त्याला पंधरावीस खिसे! डोळयांना बारीक काडीचा चष्मा. नजर घारीची अन् नाक गरुडाचे.

हा माणूस पुढे आला अन् डेकवरून जाणाऱ्या नोकराला अडवून म्हणाला, 'मी सहा नंबरच्या केबिनमधे आहे. मला निघाल्यापासून खायला मिळालेलं नाही. काहीतरी आणतोस का?'

'आणतो साहेब, पण—'

जहाजाचे कॅप्टन मॅंगल्सही त्याच वेळी तिथून जात होते. ते थबकले अन् या गृहस्थाला निरखून पाहात म्हणाले, 'माफ करा आपलं नाव काय?'



'ओहो ! आपण कप्तानच, नाही का ! 'स्कॉटलंड' बोटीचे कमांडर कॅप्टन बर्टन ? माझं नाव जॅक एलासीन् फान्सुबा मारी पॅगानेल. पॅरिसच्या जिऑग्राफिक सोसायटीचा मी मेंबर आहे. बर्लिन, बॉंबे, लंडन. पीटस्बर्ग, व्हिएन्ना वगैरे शहरांचा मी वार्ताहार.'

'ते सगळं ठीक आहे.' लॉर्ड एडवर्डही तेवढयात तिथे आले होते. त्यांनी विचारले, 'पण आत्ता कुठे चाललाहात आपण ?'

'इंडियाला अर्थात. दुसरीकडे कुठे ?'

'मग आपण जहाज चुकलात साहेब. ही बोट इंडियाला जात नाही. हिचा प्रवास इथेच पूर्ण होतो आहे. तुम्ही निघतानाच भलत्याच बोटीवर पाय ठेवलात.'

'बाप रे ! मग आता मी काय करू ?'

लॉर्डसाहेब हसून म्हणाले, 'डोंट वरी. या जहाजाचा मी मालक आहे. मॅदीरा बंदरात उतरल्यावर मी तुम्हाला इंडियाला जाणारं एखादं जहाज गाठून देईन.'

'थँक्स्.'

पण पुढे या घारोळ्या पॅगानेलची आमच्या मंडळींशी इतकी घनिष्ठ मैत्री जुळली की कॅ. ग्रँटची कहाणी ऐकल्यावर अन् संदेशाचा तो कागद पाहिल्यावर त्याने हिंदुस्थानचा दौरा रद्द केला अन् म्हटले, 'मी पण तुमच्याबरोबर आलो तर चालेल का ? कॅप्टन ग्रँटच्या शोधात मी तुम्हाला मदत करू शकेन.'

'अवश्य चला ! यू आर वेलकम !'

स्कॉटलंडचा किनारा सोडल्याला चाळीस दिवस झाले. ब्राझिल मागे टाकून दक्षिण अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्याने डंकन खाली गेली.

'आता आपल्याला दिसतोय तोच पॅटागोनिया देश' बरं का ?' मेजर मॅकनॅब्स म्हणाला.

'हो–' लॉर्डसाहेब दुर्बिणीतून पाहात म्हणाले, 'पण ती राक्षसी

माणसं कुठेच दिसत नाहीत ? – ताडमाड उंचीची नि फताड्या पायाची ? '

केप हॉर्न भूशिर जवळ आले तरी असा एकही राक्षस त्यांना दिसला नाही. जी दहावीस माणसे दिसली ती काळी कभिन्न नि रानटी असली तरी सामान्य उंच माणसांएवढीच होती.

केप हॉर्नला वळसा घालण्याचे अवघड काम त्यांच्या सुदैवाने पार पडले. धुवांधार वादळात पाणी कुठे नि जमीन कुठे याचा पत्ता लागत नाही असा हा तुफानी प्रदेश आहे. पण या खेपेस समुद्र तितका खवळलेला नव्हता आणि दृष्टिमानही चांगले होते. सामुद्रधुनीतून डंकन जहाज पश्चिमेला पॅसिफिक महासागरात प्रविष्ट झाले आणि मग लवकरच त्यांनी ताल्काहुआनो नावाच्या चिलीतल्या बंदरात नांगर टाकला.

उतरल्याबरोबर लॉर्डसाहेब आधी तिथल्या ब्रिटिश वकिलातीत जाऊन आले.

' नाही. इथल्या वकिलाला काही माहीत नाही ' त्यांनी परत येताच सांगितले. ' तो म्हणतो कॅप्टन ग्रँट कदाचित इथे लागलेही नसतील. अर्जेन्टिनाच्या किनाऱ्याला लागले असतील. '

' पण – पण – चिठ्ठीत तर ते कुठे पडले ते स्पष्ट लिहिलेलं होतं. पॅटागोनिया – ३७ अक्षांशावर ! '

पॅगानेल म्हणाला—

' कदाचित जंगली लोकांनी त्यांना आधी अन्तर्भागात नेलं असेल. ' आम्ही जंगली लोकांचे कैदी आहोत ' असं चिठ्ठीत म्हटलेलं नाही. ' कैदी बनणार ' अशी भीती व्यक्त केलीय. '

' म्हणजे ३७ अक्षांशावरच पण जंगलात कुठे तरी त्यांनी बाटली फेकली म्हणता ? तिथे बाटली फेकून कसं चालेल ? ती समुद्रात टाकावी लागते ! '

' नदीत टाकली तरी चालतं. नदी शेवटी समुद्रालाच मिळणार ना ? '

पॅगानेलने सर्वांना निरुत्तर केले होते. तोच पुढे म्हणाला, ' मी एक सूचना करू का ? '

' जरूर. '

पॅगानेलने टेबलावर एक नकाशा पसरीत म्हटले, ' दक्षिण अमेरिकेच्या दक्षिण भागाचा हा नकाशा आहे. हा ३७ वा अक्षांश. पश्चिमेला पॅसिफिक तर पूर्वेला ॲटलांटिक महासागर. हा पश्चिम-पूर्व प्रदेश आपण पायाखाली घालू या. पूर्ण तयारीनिशी निघू. कारण मोहीम फार अवघड आहे. आधी ॲण्डीज पर्वत. मग पावसाने झोडलेली जंगलं, मग पाम्पाची कुरणं— '

' माझी हरकत नाही. ' लॉर्ड एडवर्ड म्हणाले आणि मग सर्वच जण ही योजना स्वीकारायला तयार झाले. नाहीतरी दुसरा मार्गच नव्हता. हा साराच मुलूख पायी तुडवणे त्यांना भाग होते—त्यातल्या त्यात नद्यांच्या प्रवाहावर विशेष लक्ष ठेवून.

या मोहिमेचा मार्ग आखण्याची जबाबदारी पॅगानेलवरच सोपवण्यात आली. त्याच्याच सूचनेवरून लेडी हेलन अन् मेरी ग्रँट यांची रवानगी तूर्त ब्युएनॉस एरीस शहराकडे करण्यात आली.

' तू अजून लहान आहेस ' लॉर्ड एडवर्ड रॉबर्ट ग्रँटला म्हणाले. ' तू पण यांच्याबरोबर जा. तुला ही खडतर मोहीम झेपणार नाही ! '

' मी मुळीच मागे थांबणार नाही ! ' रॉबर्ट रागावून म्हणाला. ' माझ्या बाबांचा शोध करताना मी मागे राहीन हे शक्य नाही ! '

शेवटी लॉर्डसाहेबांना त्यालाही बरोबर घेणे भाग पडले.

म. ग्रं. सं. ... वाचनालय.
क्र. 2036 ... 19/11/68
विषय ०११.वा क्र. . . . . .


# २

# पायी मोर्चा सुरू

ऑक्टोबरच्या १४ तारखेला मोर्चाला सुरुवात झाली. माल नि माणसे यांनी लादलेला पंधरा घोड्यांचा नि खेचरांचा तो एक लांब काफिला होता. लॉर्ड एडवर्ड, मेजर मॅकनॅब्स, रॉबर्ट अन् मि. पॅगानेल या मुख्य मंडळींखेरीज ऑस्टिन, विल्सन अन् मरे नावाचे तीन धाडसी खलाशी-देखील मोहिमेत हौसेने सामील झाले होते. शिवाय पाच-सहा पगारी नोकरही होते.

रस्ता खराब असूनही पहिल्या दोन दिवसांत त्यांनी चांगली प्रगती केली. लवकरच त्यांना अर्जेन्टिनातली पर्वतश्रेणी दिसू लागली.

'आपण चिलीचं राज्य ओलांडलं खरं—' मेजर मॅकनॅब्स म्हणाला, 'पण खरी कसोटी पुढेच आहे. तो धिप्पाड अँडीज पाहिलात ना?'

'हं!' पॅगानेल तिकडे बोट दाखवीत म्हणाला. 'आणि त्याची ती हिमाच्छादित शिखरं. आपण जाणार आहोत त्या आन्तुको पास खिंडीतून.'

'बाप रे ! ती खिंडसुद्धा उंचावरच दिसते !'

'नऊ हज़ार फूट !' पॅगानेलने माहिती दिली.

पण त्या खिंडीच्या पायथ्याशी जेव्हा ही मंडळी जाऊन पोचली तेव्हा तिथे त्यांना चिखलाने माखलेले अवाढव्य धोंडे आढळले.

'दरड कोसळली आहे' नोकरांपैकी एकाने सांगितले. 'आन्तुको खिंड बुजलेली दिसते. आपल्याला दुसऱ्या एखाद्या खिंडीतून जायला हवं. तिथून जाणं भयंकर धोक्याचं होईल.'

'दुसरी खिंड जर ३७ वा अक्षांश सोडून फार दूर असेल, तर आपल्याला हा भयंकर धोकाच पत्करणं भाग आहे.' लॉर्डसाहेब म्हणाले.

खिंडीत पडलेल्या त्या प्रचंड धोंड्यांना वळसे घालीत जनावरांचा नि माणसांचा तो तांडा तो कठीण वाट चढायला लागला. पुढे पुढे त्यांना भुरभुरीत हिम नि टणक बर्फही तुडवावे लागले.

मेजरने एकाएकी घोड्याचा लगाम खेचला. तो म्हणाला, 'तिकडे एक खोपटं दिसतंय. पाहिलंत ?'

'रिकामंच पडलेलं असणार.' लॉर्ड एडवर्ड म्हणाले, 'रात्र घालवायला बरी जागा मिळाली !'

खोपटं लाल दगडाचं होतं आणि बऱ्याच दिवसांत तिथे कुणाचा वावर झालेला नव्हता हे स्पष्ट दिसले. लगेच या प्रवाशांनी त्याचा ताबा घेतला. नोकरांनी जाळ पेटवला अन मटण भाजले. मजेत जेवण करून मंडळींनी तण्णावून दिली.

रात्र भयाण शांततेची होती. पशुपक्ष्यांचे आवाजही येत नव्हते. फक्त बऱ्याच दुरून शीळ वाजावी तसा वारा घुमत येत होता अन डोंगरदऱ्यांतून त्याचे पडसाद उठत होते.

'वादळ असेल. अशी बारीकसारीक वादळं इथं नेहमीच चालू असतात.' पॅगानेल म्हणाला आणि मेजरने मान डोलावली.

पण नोकरांना मात्र ते वादळ उडवून लावण्याइतके तुच्छ वाटले नाही. त्यांच्यात कुजबूज चालू होती त्यावरून पॅगानेलच्या हे लक्षात आले. पण पुन्हा काही आवाज झाला नाही तेंव्हा तिकडे दुर्लक्ष करून तो कुशीवर लवंडला अन् झोपी गेला.

फार वेळ जातो न जातो तो सर्वच माणसे खडबडून जागी झाली. एक प्रचंड हादरा बसून भिंतीतले काही दगड निखळले होते. डोक्या-वरच्या तुळया कोसळण्याच्या बेतात होत्या.

' भूकंप होतोय ! ' पॅगानेल ओरडला. ' सर्वजण बाहेर पडा ! '

लगेच सर्व मंडळी भराभरा खोपटाबाहेर पडली. त्याच क्षणी जिकडून तिकडून दगडधोंडे कोसळल्याचे आवाज येऊ लागले. खोपटाची तर दुर्दशा उडाली. छप्पर, भिंती कोसळून पडल्या. पायांखालच्या बर्फा-च्छादित खडकांना चिरा पडू लागल्या. प्रत्येकाच्या छातीत धडधडू लागले. धरणीमाता कोणत्याही क्षणी आपल्याला पोटात घेईल अशी त्यांना भीती पडली.

पुन्हा एक हादरा बसला अन् जागोजागी जमीन फाटली. पर्वत-शिखरावरून मोठमोठे धोंडे गडगडत खाली आले. तो मारा चुकविण्या-साठी आमच्या लोकांनी जमिनीवर पालथे पडून मातीत तोंडे लपवली. धुळीचे नि हिमाचे बोचरे पुंज त्यांच्या पाठीना चावत निघून गेले.

काही क्षण हा धूमधडाका चालला होता. मग अकस्मात सारे पुन्हा शांत झाले. सगळीकडे सामसूम पसरली.

' संपलेलं दिसतंय ! ' पॅगानेल एका कातळाच्या आडून पुटपुटला.

पण पुन्हा जेंव्हा सर्वजण त्या भग्न खोपटाभोवती जमा झाले तेंव्हा त्यांच्यात एक माणूस कमी होता – रॉबर्ट !

' माझ्याजवळ झोपला होता ! ' विल्सन तांडेल म्हणाला.

' एकाएकी कुठे नाहीसा झाला देव जाणे ! '

लगेच रॉबर्टचा तपास जारीने सुरू झाला. सबंध दिवस शोध चालू

होता. डोंगरकपारीतली घळन् घळ तपासण्यात आली. त्याला हाक मारून सर्वांचे घसे कोरडे झाले. पण रॉबर्टचा कुठेही पत्ता लागला नाही.

लॉर्ड एडवर्डना आता फारच चिंता वाटू लागली. सबंध पर्वत पालथा घालून झाला होता. आता त्यांची नजर शिखराकडे वळली. तिथे बर्फाची टोपी चकचकत होती. आणि....आणि दुसरेही काहीतरी दिसत होते...

गिधाड !

'गिधाड आपल्या पंज्यांनी काहीतरी ओढून नेतंय !...वासरू... वासरू असणार !...बाप रे ! काय शक्ती आहे या गिधाडाच्या अंगात ! उडाला की त्याला घेऊन !'

'ते वासरू नाही !' मेजर मॅकनॅब्स किंचाळला. 'तो माणूस आहे...तो रॉबर्ट आहे...रॉबर्ट !'

पक्षी आता शिखरावरून उडून खाली येत होता. मेजरने फार जपून बंदुकीचा नेम धरला. पण तो बंदुकीचा चाप दाबण्याआधीच दुसऱ्या कुणीतरी गोळी झाडली होती.

'ठह !'

गिधाडाचा मृतदेह सपाट्याने खाली येऊन बर्फात आदळला. सर्व-जण पुढे धावले. मेलेले गिधाड इतके जड होते की तिघाचौघांनी हात लावला तेव्हाच ते ओढून बाजूला करता आले. लॉर्ड एडवर्ड रॉबर्टच्या अंगावर वाकले.

'बेशुद्ध !' ते उद्गारले. 'पण श्वास चांगला चाललाय !' ताठ होऊन त्यांनी आपल्या भावाला प्रश्न केला, 'तू झाडलीस ती गोळी ?'

'मी नाही !' मेजरने मान हलवली.

दुसऱ्याच क्षणी त्यांना उत्तर मिळाले. एक पॅटागोनियन माणूस डोंगर उतरून येत होता. त्याच्या हातात बंदूक होती. तो रेड इंडियन असावा. पायात झिपऱ्या काठाची तुमान, अंगात कोल्ह्याच्या कातड्याचा डगला अन् डोक्यावर फताडी हॅट, कंबरेला लासो नि खंजीर.

' माझं नाव थाकाव्ह. मला इथल्या सगळ्या वाटा माहीत आहेत.' तो म्हणाला. ' मी तुमची सेवा करू शकेन.'

लॉर्डसाहेबांनी आपला हात पुढे केला. ' उत्तम.' ते म्हणाले 'देवानंच पाठवलं की तुला !'

थाकाव्ह चांगला माहीतगार माणूस आहे याचा भरपूर अनुभव मंडळींना आता आला. खडक-खिंडीतून तो बेधडक वाटा काढीत चालला होता. धीमा शांत स्वभावाचा तरुण. गोंधळून जाणे त्याला ठाऊक नव्हते. पॅगानेलसारख्या पंडिताच्या कोणत्याही प्रश्नाला तो न घुटमळता उत्तर द्यायचा.

रॉबर्ट त्या विचित्र प्राणसंकटातून सहीसलामत सुटला होता अन् चांगली घोडदौड करीत होता. खडतर मार्गावरून खूप वाटचाल केल्या-नंतर ऑक्टोबरच्या अखेरीस मंडळी पर्वतश्रेणीच्या पार झाली. त्यानंतर त्यांना वैराण मुलूख लागला. कुठेही पाण्याचे टिपूस आढळेना. पाया-खालची जमीन क्षारयुक्त पण सुकलेली, जागोजाग तडे गेलेली अशी होती. जवळचे पाणी संपत आले होते. अन् तोंडचे पाणी पळाले होते. घोड्यांची पावले जड पडत होती.

आणि मग एका दुपारी घोडयांना एकाएकी काय झाले कुणास ठाऊक ! पण त्यांच्या पायांना गती आली. थाकाव्हचा घोडा ठंका अत्यंत उमदा, हुशार, सशक्त. तो तर खिंकाळत धावत सुटला.

' हा काय प्रकार आहे ?' रॉबर्टने ओरडून विचारले.

थाकाव्ह मागे वळून हसत म्हणाला, ' घोडयांना पाण्याचा वास आलाय !'

पांढरी पडलेली ती खारी जमीन हळूहळू रंग धरू लागली. टणक पोपडे ठिसूळ मऊ बनले आणि मग तर काय हिरवळीचा गालिचाच त्यांना लागला. लवकरच ते एका नदीच्या काठावर आले.

' रिओ ग्वामिनी ' लॉर्ड एडवर्ड त्या जलप्रवाहाकडे पाहात आनंदाने

उद्गारले, ‘ रिओ ग्रान्द नदीची ही एक उपनदी आहे ! ’

सर्वजण पोट भरभरून पाणी प्याले आणि मग त्यांच्या लक्षात आले की अंधार पसरलेला आहे; आपल्याला इथेच थांबले पाहिजे. थाकाव्हला नदीच्या वाळवंटात एक ओस पडलेले तारेचे कुंपण आढळले. मेंढरांच्य कळपासाठी धनगरांनी केलेली ती सोय असावी. त्या आवारात त्यांनी मग रात्रीचा मुक्काम केला. श्वापदांपासून रक्षण करण्यासाठी त्यांनी शेकोटी पेटवून ठेवली.

मध्यरात्री थाकाव्हने आपल्या सोबत्यांना घाईघाईने जागे केले.

‘ काय झालं ? ’

‘ धोका ! संकट ! – लवकर उठा...बंदुका घ्या ! ’

घोडेही अस्वस्थ होऊन पाय आपटीत होते एक भली मोठी सावली ठंकाच्या जवळ सरकताना दिसली. तत्क्षणी थाकाव्हने बंदूक झाडली.

‘ काय होतं ते ? ’ लॉर्ड एडवर्ड कुजबुजले आणि त्यचा क्षणी त्यांना एका कर्णकर्कश किंकाळीने उत्तर मिळाले.

‘ लाल लांडगा ! ’ थाकाव्ह म्हणाला. ‘ एक नाही, अनेक. भुकेल्या लांडग्यांचा कळप आलाय ! ते कशालाही डरत नाहीत. रात्रभर आपल्याला गराडा झालतील. उजाडल्यावर निघून जातील ! ’

हे बोलतानाच त्याने पुन्हा बंदूक झाडली होती. त्याच्या मागोमाग लॉर्ड एडवर्डनी आपली बंदूक झाडली. एका लांडग्याचा कपाळमोक्ष झाला.

विझत चाललेल्या शेकोटीत रॉबर्टने काही वाळके गवत टाकले. लगेच पुन्हा जाळ भडकला. लांडग्यांची फौज मागे हटली. पण काही वेळाने पुन्हा ते चहू बाजूंनी चालून यायला लागले.

लॉर्ड एडवर्डनी बंदूक झटकली. ‘ बाप रे ! दारूगोळा संपलाय ! आता काय करणार आपण ? ’

थाकाव्हने खंजीर उपसला अन् पुढे येणाऱ्या लांडग्यांना रोखून धरले.

'मी दौडत निघून जातो. म्हणजे ते माझ्या मागे लागतील!' तो ओरडला.

'नाही–नाही!' लॉर्ड एडवर्ड ओरडले. जवळ आलेल्या लांडग्याच्या डोक्यात त्यांनी बंदुकीचा दस्ता हाणला होता. 'तुला ते फाडून खातील! तू जाऊ नकोस!'


'तू जाऊ नकोस!' रॉबर्टही ओरडला. 'मी हलका आहे, मी जातो!'

आणि कुणाच्याही विरोधाला न जुमानता त्याने ठंकाच्या पाठीवर उडी मारली आणि तो हा हा म्हणता दूर निघून गेला.

'सिन्यॉर, तुम्ही काळजी करू नका.' थाकान्ह गंभीरपणे म्हणाला. 'ठंका वेगवान जनावर आहे आणि रॉबर्ट शूर आहे.'

लॉर्ड एडवर्डनी एक आवंढा गिळला. थाकान्ह सांगत होता ते सगळे खरे असले तरी लांडग्याची सारी झुंडच्या झुंड तो शूर घोडेस्वार पळाला त्या दिशेने धावत होती. यांच्यावरचे संकट मात्र टळले होते.

थाकान्हचा आत्मविश्वास खरा ठरला. दुसऱ्या दिवशी सकाळी ठंकावर स्वार झालेला रॉबर्ट सुखरूप छावणीवर परतला!



पिशव्यात भरपूर पाणी भरून घेतल्यावर मंडळींनी नदीतीर सोडले. पुन्हा त्यांना वाळक्या गवताचे कुरण लागले. नंतर रिओ निग्रो नि रिओ कॉलोराडो या दोन नद्यांच्यामधला मुलूख तुडवीत ते खाली गेले. आत उष्मा कमी झाला होता. हवेत ओल भरले होते. पायांखाली पाण्याची डबकी लागत होती. काही उथळ तर काही खोल–फसवी. पुढे त्यांना जी दलदल लागली तिच्यातून तर घोड्यांना फारच जपून न्यावे लागले.

थाकाव्ह सारखा वर आकाशाकडे पाहात होता.

‘ कसली शंका येतेय तुला ? ’ लॉर्डसाहेबांनी विचारले.

‘ डोंगरातून वादळ येतंय ! ’

‘ आपल्यापर्यंत आलं तर ? ’

‘ आपल्याला जलसमाधी मिळण्याचा धोका आहे. कारण असं वादळ झालं की नीग्रो नि कॉलोराडो या दोन्ही नद्यांना पूर येतो, आपण ज्या भागात आहो तो भाग म्हणजे एक प्रचंड तलाव बनतो ! ’ हे उत्तर पॅगानेलने दिले होते आणि त्याला थाकाव्हनं मान डोलवून अनुमती दर्शविली होती.

या सापळ्यात अडकणे नको म्हणून सर्वांनी आपल्या घोड्यांना टाच मारली. पण ही शर्यत जिंकणे आपल्याला शक्य नाही हे त्यांना लवकरच कळून चुकले. वादळ धूमधडाक्याने त्यांचा पाठलाग करीत होते. मुसळधार पाऊस पडू लागला.

आणि मग पाऊस आला तसा एकाएकी थांबला. पण दरम्यान पायांखाली गुडघा गुडघा पाणी साचले होते. इतकेच नाही तर–

‘ मागे पाहा ! ’ मेजर मॅक्नॅब्स ओरडला.

सर्वांच्या माना मागे वळल्या. पाठीमागून मातकट रंगाची पाण्याची भिंतच्या भिंत पुढे सरकत येत होती.

‘ पळा–पळा आधी ! त्या झाडावर चढा ! ’

मेजर ज्या झाडाकडे बोट दाखवीत होता तो एक जंगी ओंबू वृक्ष

होता.

सर्व मंडळी पाणी तुडवीत झपाट्याने त्या वृक्षाकडे निघाली. पण त्यांनी त्याचा बुंधा गाठण्यापूर्वीच पुराने त्यांना गाठले होते. मात्र पाणलोटामुळे त्यांचे नुकसान होण्याऐवजी फायदाच झाला. झाड चढून जाण्याचे श्रम वाचले ! नव्वद फूट उंचीचा तो वृक्ष एव्हाना अर्धा पाण्याखाली बुडाला होता. त्यामुळे हाताशी आलेल्या वरच्या फांद्या कवटाळून ते भराभर वर चढले. झाडाचा शेंडा गाठल्यावर प्रत्येकाला चांगले आरामात बसता आले. आता सर्वांनी भीत भीत एकमेकांकडे पाहिले.

‘ हाजिर ! सर्वजण हजर आहेत ? ’ लॉर्डसाहेबांच्या रुद्ध कंठातून शब्द आले.

‘ नाही ! – सर्व नाहीत. थाकाव्ह दिसत नाही ! ’ रॉबर्ट म्हणाला.

‘ आणि घोडे ! ते वहात गेले की ! ’ मेजर दूर पाहात उद्‌गारला.

‘ तो पाहा ठंकाच्या पाठीवर बसलेला थाकाव्ह वहात चालला आहे ! ’ – लॉर्ड एडवर्ड.

‘ बाप रे ! आपल्याला गेलंच पाहिजे त्याच्या मदतीला. ’ असे म्हणून रॉबर्टने खाली पाहिले.

‘ अरे बाप रे ! ”

खाली दुसरेच एक संकट आ वासून उभे होते. पाण्याबरोबर वहात आलेल्या मगरी !

म्हणजे आता झाड उतरून जाणे शक्य नव्हते.

‘ मला वाटतं आपण थाकाव्हची काळजी करू नये ! ’ ‘ मेजर मॅकनॅब्स म्हणाला. ‘ तो पुरातून सुरक्षित गेला असेल. ’

‘ आणि हा पूरही जास्त काळ टिकणार नाही. ’ पॅगानेल.

हा मध्यन्तराचा काळ त्यांना वृक्षाच्या शेंडयावरच घालवणे भाग होते. सुदैवाने त्यांना त्या ‘ ओंबूवाडी ’त उपास घडला नाही. कारण तिथे

पक्ष्यांची घरटी भरपूर होती आणि त्यांत अंड्यांचा सुकाळ होता.

पण त्यांचा फराळ चालू असताना आणखी एका महाभुताने आपला इंगा त्यांना दाखवला.

विद्युल्लता !

बा. क्र. 2036 दिनांक 9/9/66
विषय ८११.५१ क्र. . . . . .

## ३

# पॅगानेल म्हणतो, ‘सर्वच चुकलं’

एखादे अग्न्यस्त्र यावे तसा विजेचा लोळ येऊन वृक्षाच्या शेंड्यांवर आदळला होता. क्षणार्धात झाड पेटले होते. प्रत्येकजण भयभीत होऊन त्या दृश्याकडे पाहतो आहे तोच वाऱ्याचा एवढा प्रचंड झोत आला, की ते जळत असलेले झाड आपल्या प्रवाशांसकट उन्मळून पाण्यात पडले अन् वहात चालले. संकट इतके भीषण होते की प्रत्येकाने आपापली फांदी घट्ट कवटाळून धरली, डोळे मिटले अन् श्वास रोधून धरला.

पण हा नव्याने बसलेला तडाखा त्यांना जो महासंकट वाटला होता, तोच त्यांचा तारणहार ठरला. वृक्ष पाण्यात कोसळताच ती भडकलेली आग काही क्षणांत विझली. आपल्या फांद्यांना बिलगलेले ते मानवप्राणी घेऊन वृक्षराज खाली वहात चालला.

आणि मगरी ?

त्यांनाही आपला जीव प्यार होताच. त्यांच्याच प्राणांवर संकट आले असताना त्यांना शिकार कुठची सुचणार? त्या केव्हाच घाबरून दूर

कुठेतरी पळाल्या होत्या.

दुसऱ्या दिवशी तो महापूर ओसरला आणि 'ओंबू' तराफ्यावर बसलेले प्रवासी सुखरूप काठाला लागले. कुणालाही म्हणण्यासारखी इजा झालेली नव्हती.

आणि मग दोन दिवस वाटचाल केल्यानंतर त्यांची नि थाकाव्हची पुनर्भेट झाली. अॅटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर ठंकाच्या पाठीवर हात ठेवून तो त्यांची वाट पाहात उभा होता ! आणि लेडी हेलन अन् मेरी ग्रँट यांच्यासह कॅ. मँगल्स आपली डंकन बोट घेऊन समुद्रात त्यांची वाटच पाहात होते !

'थाकाव्ह !' सर्वांनी एकसुरात हाक दिली.

थाकाव्हने हात हलवून सस्मितमुखाने त्यांचे स्वागत केले.

'नुसता ठंका नाही — एकूणएक घोडे वाचवलेत त्याने !' रॉबर्ट ओरडला. 'ते पाहा फुरफुरत उभे आहेत !'

'हो. पण त्यांचा आपल्याला उपयोग नाही आता !'

हे उद्गार कुणी काढले म्हणून सर्वांनी वळून पाहिले. पॅगानेलचे सागरगोट्यांसारखे डोळे चष्म्याआडून लुकलुकत त्यांच्याकडे बघत होते.

'रागावू नका !' पॅगोनेल म्हणाला. 'पण आपण एक फार मोठी चूक केली आहे.'

'कसली चूक ते सांगा ना ?' मेजर मॅकनॅब.

'सांगतो. आतापर्यंत आपण एवढी पायपीट केली. नदीकाठ पालथे घातले, पण कुठेही आपल्याला कॅप्टन ग्रँटचा पत्ता लागला नाही. असा एकही माणूस—सुधारलेला किंवा रानटी भेटला नाही की ज्याने कॅप्टन ग्रँटला पाहिलं आहे, किंवा त्यांच्याबद्दल काही ऐकलं आहे याचा अर्थ एकच. कॅप्टन ग्रँट या भागात आलेच नाहीत !'

'ते कसं काय ? आम्हाला मिळालेला तो संदेश ?'

'तो अस्पष्ट होता. पुसलेली अक्षरं जुळवून तुम्ही चिठ्ठी वाचलीत.

पण जुळवताना तुमची चूक झाली. कसं ते पाहा.

37° 11' Austra ... च्या पुढली अक्षरं पुसलेली होती. तुम्ही Austra इथे शब्द पुरा झालाय असं धरलंत. Austra म्हणजे 'दक्षिण'. '३७°११' अक्षांशावर दक्षिण गोलार्धात एवढाच अर्थ तुम्ही काढलात. Indi... वरून तुम्ही Indian असा शब्द जुळवलात. आणि Red Indians हे फक्त अमेरिका खंडात असल्यामुळे तुम्ही दक्षिणअमेरिका गृहीत धरलीत. आता ... Onia ने नाव पूर्ण होणारा देश कोणता आहे? तर Patagonia. आणि पॅटागोनियातून ३७°११' अक्षांश जाते हेही खरं. त्यामुळे तुम्ही पॅटागोनियावर येऊन ठेपलात. अशा तीन चुका तुम्ही केल्यात!'

'मग बरोबर काय आहे म्हणता?'

'Austra... ची पुढली पुसलेली अक्षरं जोडा. Australia होतो आणि... Onia हे पॅटागोनियासाठी नसून ऑस्ट्रेलियाच्या पूर्वेकडील एका बेटासाठी New Caledonia साठी आहे! अर्थात आपण जायला हवं होतं ऑस्ट्रेलियाकडे. दक्षिण अमेरिकेकडे नाही! ऑस्ट्रेलियाकडूनसुद्धा ३७°११' अक्षांश जातो.'

'ग्रेट लॉर्ड!' हा आश्चर्योद्गार लार्डसाहेबांचा! 'पण मग इंडियन्सचं काय? ऑस्ट्रेलियात रेड इंडियन्स थोडेच आहेत?'

'सांगितलं ना? तीही तुमची चूक झाली. Indi... च्या पुढे आपल्याला हवी ती अक्षरं जोडून तुम्ही Indians केलंत. खरा शब्द असणार Indigenous म्हणजे तद्देशीय, किंवा नेटिव्ह. 'त्या देशातल्या जंगली जमातीचे आपण कैदी बनणार' असं चिठ्ठीत लिहिलेलं होतं. 'रेड इंडियन्स' मधली जंगली जमात असं चुकीचं गृहीत धरून तुम्ही दक्षिण अमेरिकेकडे वळलात!'

'तरीसुद्धा मला एक शंका आहे—' मेजर मॅकनॅब्स म्हणाला. 'ब्रिटानिया बोट पेरू देशातल्या कॅलाओ बंदरातून ३० मे रोजी निघाली

होती हे सर्वांना माहीत आहे. कॅप्टन ग्रँटची चिठ्ठी ७ जूनची आहे. दक्षिण अमेरिकेहून निघालेली आगबोट आठ दिवसांत ऑस्ट्रेलिया गाठू शकेल हे शक्य आहे का?'

'आठ दिवसांत नाही, पण अठ्ठावीस दिवसात गाठू शकेल!' पॅगानेल म्हणाला, 'तुम्ही ७ जून वाचलंत. पण ७ आकड्याच्या आधी जागा कोरी सुटली होती असं नाही तुम्हाला वाटत? आधीचा आकडा पुसलेला असावा. खरी तारीख २७ जूनच असणार!'

'ओः गॉड!' लॉर्ड एडवर्ड म्हणाले, 'म्हणजे आपलं हे सगळं समुद्रमंथन आणि पदयात्रा...सगळं फुकटच गेलं म्हणायचं!'

पॅगानेलच्या डोळ्यांनी लुकलुक केली. 'फुकटातूनही काही विकत घेता येतं!' तो म्हणाला.

त्याने काढलेल्या मुद्यावर नंतर पुष्कळ भवती न भवती चर्चा झाली. पण शेवटी सर्वांना मान्य करावेच लागले, की पॅगानेल म्हणतो ते अगदी बरोबर आहे. कॅप्टन ग्रँटच्या शोधासाठी आपल्याला ऑस्ट्रेलियाकडेच वळायला हवे.

एवढे निश्चित झाल्यावर बोटीवर भरपूर शिधासामग्री, शस्त्रे नि कोळसा भरून घेण्यात आला. आणि एका सुप्रभाती 'डंकन' त्या प्रदीर्घ प्रवासाला निघाली!

प्रवास फारच मोठा नि कंटाळवाणा होता आणि कॅप्टन ग्रँट तिथे तरी सापडतील की नाही याची खात्री नव्हतीच. पण पॅगानेलची आशा जबरदस्त होती. 'ऑस्ट्रेलिया देशही फार मोठा आहे.'

'तुम्हाला काय वाटतं – ग्रँट त्या देशाच्या पूर्व किनाऱ्याला लागले असतील, की पश्चिम?'

'पश्चिम' पॅगानेल म्हणाला. 'त्याबद्दल मला शंका नाही. आपल्याला जंगली लोक पकडणार अशी त्यांना भीती वाटत होती. जंगली टोळ्या त्याच भागात आहेत. ऑस्ट्रेलियाचा पूर्व किनारा आता गोऱ्या लोकांनी

व्यापलेला आहे. तिथे रानटी लोकांचं भय उरलेलं नाही.'

ऑस्ट्रेलियाच्या नैर्ऋत्य टोकाचे जाफा भूशिर गाठण्याच्या बेताने कॅ. मॅंगल्स आगबोट नेत होते. त्यांना भयानक वादळाला तोंड द्यावे लागले होते. त्यावेळी समुद्र इतका खवळलेला होता की जणू एखादी दुष्ट चेटकी आपल्या प्रचंड कढईत विषारी द्रव्य उकळते आहे असाच भास व्हावा! बोटीत पाणीच पाणी साचले. शीड फाटून त्याची लक्तरे झाली. बोटीचे प्रॉपेलर्स– पुरःसारकचक्रे – बिघडली आणि एंजिन थंडावले. आमच्या शूर प्रवाशांची उमेदही यावेळी थंडावली. पण कप्तान जबर धीराचा माणूस होता आणि त्याचे खलाशीही तितकेच शूर होते. अहोरात्र एंजिन रूमवर जागता पहारा ठेवून अन् डेकवरच्या पाण्याचा सतत उपसा करीत त्यांनी त्या महासंकटातून तारू निभावून नेले. अखेरीस जोरदार वाऱ्यांनीच आकाशातल्या ढगांना जेव्हा दूर हाकलून दिले, तेव्हा समुद्र शांत झाला आणि मग डोलकाठीवर चढलेल्या टेहळ्याने जेव्हा 'जमीन! जमीन!' म्हणून पुकार केला, तेव्हा मंडळींच्या आनंदाला सीमा राहिली नाही.

कॅप्टन मॅंगल्सनी आपण नक्की कुठल्या भागात आलो आहो याचे गणित केले मग ते डेकवर जमलेल्या मंडळींना उद्देशून म्हणतात. 'मित्रहो! भवाच्या वादळाने आपलं नुकसान केलं खरं, पण त्याहीपेक्षा फार मोठा फायदा करून दिला आहे. तुम्हाला जी जमीन दिसते आहे ती ऑस्ट्रेलियाचा दक्षिण किनारा आहे – प्रांत ॲडीलेड!'

'हुर्रे!' त्यांच्या श्रोत्यांनी आनंदाचा जयघोष केला.

'आपल्या पुढ्यातली ती जमीन म्हणजे कॅटॅस्ट्रॉफी नावाचं भूशीर—'

'कॅटॅस्ट्रॉफी! बाप रे! म्हणजे संकट!' कुणीतरी उद्गारले.

'सुरुवातीच्या संशोधकांना त्याने संकटात पाडलं म्हणून तसं नाव त्याला दिलंय. पण आज तिथे उतरणं तेवढं धोक्याचं राहिलेलं नाही.'

'एक बेटही दिसतंय –'

'त्याचं नाव कांगारू आयलंड!'

'वा ! अगदी ऑस्ट्रेलियाला शोभेसं नाव आहे !'

ऑस्ट्रेलियाची जमीन जवळ आली म्हणून सर्वांनाच आनंद झाला होता. पण ग्रँट बहीण-भावांच्या उरात मात्र धडधड होत होती. आता तरी आपले बाबा आपल्याला भेटतील का ? की ही मोहीम पण अपेशी ठरेल ?

लवकरच योग्य वेळ पाहून कॅ. मँगल्सनी बोट तिथल्या आखातात नेऊन नांगर टाकण्याचा हुकूम केला. या ठिकाणी डंकन बोट काही दिवस उभी करून तिची डागडुजी करण्याचा त्यांचा बेत होता.

मंडळी ज्या जागी उतरली तिथे एक उंच कडा सामोरा आलेला होता. पण तो चढून जाणे कठीण नव्हते.

वर पोचल्यावर त्यांनी क्षणभर तिथे उभे राहून आसमंताची पाहणी केली. थोड्याच अंतरावर त्यांना एक शेत अन् पवनचक्की दिसली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिथला शेतकरी मालक त्यांचे जणू स्वागत करायला उभा होता.

तो, त्याची बायको नि पाच मुलगे !

'या ना !' तो स्मितपूर्वक म्हणाला. 'तुम्ही थकलेले, भुकेले दिसता. तुम्हांला लांबून पाहिलं तेव्हाच आम्ही सैंपाकाची तयारी केली !'

जेवताना त्याने आपली अधिक ओळख करून दिली. 'माझं नाव पॅडी ओमूर.' तो म्हणाला. 'आम्ही वरीच वर्षं इथे शेती करून राहतो आहो. कष्ट करणाराला इथे पुरेसं पीक मिळू शकतं.'

'ते दिसतंच आहे' लॉर्ड एडवर्ड म्हणाले आणि मग त्यांनी आपल्या प्रवासाचा उद्देश त्याला समजावून दिला.

'नाही,' पॅडी मान हलवून म्हणाला. 'ब्रिटानिया बोट या भागात बुडालेली नाही आणि कॅप्टन ग्रँट हे नावही मी ऐकलेलं नाही.'

'पण कॅप्टनसाहेब जिवंत असले तर ते ऑस्ट्रेलियातच असणार.' पॅडीच्या नोकरांपैकी एक मधेच म्हणाला.

त्याच्या या निश्चित विधानाचे सर्वांनाच आश्चर्य वाटले.

' कशावरून ? ' मेजर मॅकनॅब्सनी प्रश्न फेकला.

' कारण ब्रिटानिया बुडाली तेव्हा मी स्वत: तिच्यावर होतो. '

काही क्षण त्याचे श्रोते विस्मयाने अवाक् बनले होते. मग तो माणूसच पुढे बोलू लागला –

' माझं नाव जिम आयर्टन. ब्रिटानियावर मी एक कनिष्ठ अधिकारी म्हणून काम करीत होतो. जहाज खडकावर आपटून फुटलं तेव्हा माझ्या माहितीप्रमाणं सर्वजण बुडाले. माझं नशीव थोर म्हणून मी एकटा वाचलो. एका फळकुटाला धरून मी किनारा गाठला. '

' कुठे झाला हा अपघात ? '

' ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्यालगत. ३७ व्या अक्षांशावर टू फोल्ड आखातात ! माझी खात्री आहे की कॅप्टनसाहेब जर वाचले असतील तर ते ऑस्ट्रेलियातच कुठेतरी असणार. '

' आणि ब्रिटानिया केव्हा बुडाली ते सांगू शकाल तुम्ही ? '

' तारीख माझ्या मनावर कोरली गेलेली आहे· २७ जून १८६२. किनारा गाठल्यावर ऑस्ट्रेलियन आल्प्सचा डोंगराळ भाग लागला. तिथे मी जंगली लोकांच्या तावडीत सापडलो —'

' त्या भागातही जंगली लोक आहेत तर ? ' पॅगानेल. ' सगळीकडे आहेत. ' आयर्टन त्याच्याकडे रोखून पाहात म्हणाला. ' त्यांचाच देश आहे हा. तुम्ही आम्ही त्यांना नामशेष का करणार आहो ? '

' किती दिवस होता तुम्ही त्यांच्या कैदेत ? '

' दोन वर्षं. मग मी एक दिवस पळालो अन् माझी गुलामी संपली. तेव्हापासून या ओमूरसाहेबाकडे मी नोकरीला आहे. '

' एक चमत्कारच आहे ! तुम्ही आम्हांला देवासारखे भेटलात. कुणाला खरंसुद्धा वाटणार नाही, की – '

' खरं वाटणार नसेल तर मी बोटीवरचं माझं सर्टिफिकेट दाखवतो – '

असे जरा रागावल्यासारखे म्हणून तो आत निघून गेला, तेव्हा पॅगानेल म्हणाला, ' म्हणजे आता आपल्याला पूर्व किनाऱ्याकडे जाणं भाग आहे. ' डंकन ' आपल्याला हां हां म्हणता तिकडे नेऊन पोचवील. '

' हां हां म्हणता नाही ! ' मॅंगल्स म्हणाला. ' डंकनचं डबडं झालं आहे. तिच्या दुरुस्तीला वेळ लागेल आणि ती दुरुस्ती इथे आपण करू शकू असंही मला वाटत नाही. ती मेलबोर्नच्या गोदीतच न्यायला हवी ! '

' तसं असेल तर आपण खुष्कीच्या मार्गाने टू फोल्ड आखाताकडे जाऊ ! ' पॅगानेल म्हणाला. ' तसंच आपल्याला लवकर पोचता येईल. या खेपेस बायकामंडळींनाही बरोबर घेऊ. मि. आयर्टन, तुम्हाला काय वाटतं ? ' आयर्टन तेवढ्यात आपले कागद घेऊन आला होता, त्याच्याकडे वळून त्याने विचारले.

' खुष्कीचा प्रवास फार आरामाचा होईल असे नाही. पण तयारीनिशी निघालो तर जाऊ शकू आपण. ' आयर्टन म्हणाला.

' आपण ? ' लॉर्डसाहेब म्हणाले, ' म्हणजे तुम्ही पण याल आमच्या-बरोबर ? मग तर फार उत्तम ! '

नाखुषीने का होईना, पण पॅडी ओमूरने आयर्टनला रजा दिली. ' नाखुषीने ', कारण तो एक उत्तम कामगार होता. पण एकदा ठरल्यावर पॅडीने या मंडळींची सर्वप्रकारे व्यवस्था करून दिली. प्रत्येक पुरुषाला या प्रवासासाठी घोडा मिळाला आणि स्त्रिया नि सामान यासाठी दोन भक्कम बैलगाड्या मिळाल्या.

कॅ. मॅंगल्सही या खेपेस त्यांच्याबरोबर यायला निघाले. दुरुस्तीसाठी आगबोट मेलबोर्नला नेण्याची कामगिरी त्यांनी आपला सरतांडेल ऑस्टिन याच्याकडे सोपवली.

दक्षिण गोलार्धातल्या ३७ व्या अक्षांशावरून ॲडिलेड प्रांत ओलांडी-पर्यंत त्यांना काही त्रास झाला नाही. पण मग मरे नदीवरच्या कॅम्डेन ब्रिज या स्टेशनपाशी ते येऊन पोचले मात्र, त्यांना एक भयंकर दृश्य दिसले.

कॅम्डेन ब्रिजवरून पलीकडे व्हिक्टोरियाकडे जाणारी रेल्वेसडक नुकतीच बांधण्यात आल्यामुळे प्रवाशांची फार मोठी सोय झाली होती. पण आत्ता पाहतात तो हा पूल कोसळलेला ! त्याचे तुकडे तुकडे होऊन मरे नदीच्या पात्रात इतस्ततः पडलेले ! वरून जाणाऱ्या आगगाडीच्याही ठिकऱ्या उडालेल्या ! तिथल्या रहिवाशांत चौकशी करता त्यांना कळले की पर्थमधल्या तुरुंगातून पळालेल्या अत्यंत धोकेबाज कैद्यांनी हा घातपात घडवून आणला आहे !

मेजर मॅकनॅब्स पॅगानेलकडे वळून म्हणाला, ‘ काय महाशय— आपणच म्हणाला होतात ना, की ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्यावर धोका नाही म्हणून ? ’

‘ जंगली टोळ्यांपासून नाही ’ पॅगानेलने उत्तर दिले. ‘ ही घटना सर्वस्वी अनपेक्षित आहे. इंग्लंडमधल्या धोकेबाज गुन्हेगारांना ऑस्ट्रेलियात हद्दपार केलं जातं हे आपल्याला माहीत आहेच. हे सर्व पश्चिम किनाऱ्यावरच्या तुरुंगात डांबलेले असतात. तिथूनही पळून काही अट्टल कैदी इथपर्यंत आले असतील, तर त्याला मी काय करणार ? ’

अखेरीस तराफे बांधूनच ती विस्तीर्ण नदी पार करणे त्यांना भाग पडले. आणि या कामात दोन दिवस फुकट गेले.

म. ग्रं. सं. ठाणे, ... शाखा.
बाल ... व ...
बा. क्र 2036 ... 9/7/66
विषय का.पो. क्र. ........

# ४

## ‘ बूमरँग ! ’

आता १८६५ च्या जानेवारी महिन्यास सुरुवात झाली होती. अजूनही त्यांचा प्रवास ठीक चाललेला होता. युकॅलिप्टस् वृक्षांच्या गर्द झाडीतून ते चालले होते. मग त्यांना आदिवासींसाठी राखून ठेवलेला प्रदेश लागला. गोरी माणसे या भागात शिरायला सहसा धजावत नसत. थोडे चालल्यावर मेजर मॅकनॅब्स एकदम उद्गारला, ‘ मला त्या झाडावर एक भलं मोठं माकड दिसलं. तुम्ही पाहिलंत ? ’

यावर आयर्टन नि पॅगानेल एक सुरात उत्तरले, ‘ ते माकड नाही. तो माणूस आहे ! ’

खरोखरीच तो एक रानटी माणूस होता. थोड्याच वेळाने आणखी काही अर्धनग्न जंगली लोक दबकत दबकत पुढे आले आणि त्यांनी यांच्याभोवती घोळका केला. पण त्यांचा हेतू आपल्याला अपाय करण्याचा नाही हे मंडळींच्या तेव्हाच लक्षात आले. किंबहुना ते जंगली लोकच यांना भीत होते. पण मेरी नि हेलन यांनी आपल्याजवळचा खाऊ त्यांना

वाटून टाकला तेव्हा ते खूष झाले.

मग त्यांच्यांत जो वृद्ध पुढारी होता त्याने एक विलक्षण शिकारीचा प्रयोग आपल्या पाहुण्यांसाठी करून दाखवला. त्याच्या हातात एक कोयत्याच्या आकाराची लाकडी फळी होती; ती त्याने खूप जोर करून



भिरकावली. ती पहिल्याने खालून जमिनीला समान्तर अशी गेली, अन् मग एकाएकी तिचे टोक आकाशाकडे वळले, अन् सूं सूं करीत वर गेले. त्याच वेळी आकाशातून पक्ष्यांचा एक थवा उडत चालला होता. तीव्र वेगाने गेलेले ते हत्यार थव्याला कापत गेले आणि मग इंद्रधनुष्या-सारखी कमान करून खाली आले ते थेट म्हाताऱ्याच्या पायांपाशी. सात आठ पक्षी खाली मरून पडले होते.

“ बूमरँग ! ” पॅगानेल म्हणाला. ‘ मी या रानटी हत्याराबद्दल खूप ऐकलं होतं. त्याचा प्रत्यक्ष प्रयोग पहिल्यानेच बघतो आहे. ’

आणखी काही दिवस घोडदौड आणि हो ! बैलदौड केल्यानंतर मंडळी आल्प्स पर्वतापाशी जाऊन पोचली. त्याच्या पायथ्याशी एक गाव वसलेले होते. ही पर्वतश्रेणी ओलांडण्यासाठी एक सोयिस्कर खिंड आहे असे पॅगानेलने सांगितले होते. म्हणून मंडळी गावात न थांबता निघाली. पण त्या खिंडीत नुकताच पाऊस पडून गेला होता आणि वाटेत इतकी राड झाली होती की घोड्याचे खूर चिखलात रुतू लागले अन पुढे जाणेच अशक्य झाले. त्यांच्या सुदैवाने त्यांना अर्ध्या चढणीवरच एक खोपट दिसले. ते खोपट म्हणजे एक कामचलाऊ खानावळ होती अन तिचा मालक एक तिरसिंगराव होता. पण काही झाले तरी रात्रीच्या मुक्कामासाठी त्यांना डोक्यावर एक छप्पर मिळाले आणि कसे का होईना, पण ताजे गरमागरम अन्न पोटात भरता आले. खानावळीत त्यांच्या सोबतीला काही खाणकामगार होते. खानावळीच्या भिंतीवर एक पत्रक डकवलेले होते, त्याने लॉर्ड एडवर्डचे लक्ष वेधून घेतले. पत्रकातला मजकूर असा होता –

**जाहीर इशारा**

पर्थच्या तुरुंगातून जी कैद्यांची टोळी पळाली तिच्यापासून आसपासच्या रहिवाशांना धोका आहे. तरी तमाम लोकांनी सावध राहावे.

या टोळीचा पुढारी बेन जॉईस याला पकडून देणारास १०० पौंडांचे बक्षीस देण्यात येईल.

रात्रीच्या विश्रांतीनंतर ताजेतवाने झालेले हे प्रवासी पथक पुढे निघाले. आता चढण अधिकाधिक कठीण होत होती. लॉर्डसाहेब सारखे मागून येणाऱ्या बैलगाडीकडे सचिंतपणे वळून पाहात होते. आणि मग एकाएकी मरे नावाचा खलाशी–ज्याची अँडीज पर्वत ओलांडताना सर्वांनाच फार मदत झाली होती–घोड्यावरून खाली कोसळला. हे अचानक काय

झाले, म्हणून लॉर्ड एडवर्ड धावत येऊन पाहतात तो मरेचा घोडाच गतप्राण झाला होता.

'माझा घोडा घे तू !' ते ताबडतोब म्हणाले. 'मी वायकामंडळीं-बरोबर गाडीत बसून येतो !'

आणि मग आणखी काही तास लोटले नाहीत तोच पॅगानेलचा घोडाही मरून पडला.

'ही एखादी रोगाची साथ आहे की काय !' मेजर मॅकनॅब्स उद्गारले-

आणि तसेच काहीतरी असावे. कारण थोड्या वेळाने विल्सनच्या घोड्यानेही प्राण सोडले. आता मात्र लॉर्डसाहेबांनी सर्वांची एक बैठक घेतली.

'घोडे असे मरायला लागले तर आपली भलतीच पंचाईत होणार आहे, आपण ही मोहीम इथेच रद्द करू या का ?'

पण मोहिमेतून माघार घ्यायला कोणीच तयार नव्हते. तेव्हा मोहीम चालू ठेवण्याचे ठरवले.

हा निर्णय एक सोडून सर्वांच्या पसंतीचा होता. तो एक म्हणजे आयर्टन. तो म्हणाला, 'तुम्ही फार मोठा धोका पत्करला आहा, मग निदान आपल्यापैकी कुणीतरी ताबडतोब ऑस्टिनकडे जाऊन त्याला डंकन बोट विनाविलंब टूफोल्ड आखातात न्यायला सांगावं !'

'त्याचा काय उपयोग आहे ?' कॅ. मँगल्स म्हणाले. 'डंकनची डागडुजी पुरी तर होऊ दे !'

आयर्टनने 'ठीक' अशा अर्थी मान डोलावली, पण त्याला हा निर्णय मुळीच आवडला नाही.

पुन्हा डोंगर चढायला सुरुवात झाली. दुपारपर्यंत त्यांनी पर्वताचा माथा गाठला आणि मग ते पूर्वेकडचा उतार उतरू लागले. पण तेवढ्यात आकाश काळ्या ढगांनी भरले, सोसाट्याचा वारा सुटला अन् गारांच्या पावसाला सुरुवात झाली. पायाखाली इतका चिखल साचला की पुढे

प्रवास करणे अशक्यच झाले. गाडीची चाकेच मुळी चिखलात रुतून बसली.

शेवटी डोंगरउतरणीवरच्या एका मोकळ्या जागेत तंबू ठोकून तिथे रात्रीचा मुक्काम करणे त्यांना भाग पडले.

पाऊस धो धो पडत होता. तशात कुणीतरी बातमी आणली की गाडीचा एक बैल मेला !

'हे आहे तरी काय ?' आयर्टन पुटपुटला. 'ते काही नाही. मी उरलेल्या तिन्ही बैलांना आणून माझ्या राहुटीपुढे बांधतो. म्हणजे रात्रभर माझी त्यांच्यावर नजर राहील.'

त्याने त्याप्रमाणे केले. थोड्या वेळाने पाऊस थांबला. पण मेजर मॅकनॅब्सना झोप येत नव्हती. ते उठले अन् सहज फिरण्यासाठी म्हणून बाहेर पडले.

रानाच्या शिवेवर पोचतात तो कुणाची तरी कुजबूज त्यांच्या कानावर पडली. ते लगेच खाली वाकले अन् गवतातून सरपटत पुढे गेले. मग थांबले अन् कान देऊन ऐकू लागले.

दहा मिनिटांनी ते छावणीकडे परतले तेव्हा त्यांचा चेहरा चिंताग्रस्त झालेला होता.

सकाळपर्यंत आणखी दोन घोडे मेले. आता फक्त एक घोडा नि एक बैल एवढीच जनावरे शिल्लक होती.

लॉर्ड एडवर्डना शेवटी वाटले की आयर्टनने केलेली सूचना तशी वाईट नाही. मेलबोर्नला माणूस पाठवून, 'डंकन'ची डागडुजी त्वरेने आटपून बोट टू-फोल्ड आखाताकडे रवाना करण्याचा हुकूम द्यावा हे योग्यच होईल.

पण माणूस पाठवायचा म्हणजे कुणाला पाठवायचं ?

आपली शंका त्यांनी बोलून दाखवताच आयर्टन एकदम म्हणाला, 'मीच जातो की ! मला या भागाची चांगली माहिती आहे. फक्त लॉर्ड-साहेब, मला कप्तानाच्या नावे चिठ्ठी लिहून द्या. सगळं अधिकृत

असलेलं बरं. '

आणि एवढे बोलून तो लगेच सामान बांधण्यासाठी आत निघून गेला.

' या माणसाचं नाव कसं लिहायचं ? ' लॉर्ड एडवर्ड मेजर मॅकनॅब्सला म्हणाले. ' आयर्टनचं स्पेलिंग काय ? ' आणि मेजरसाहेब एकदम म्हणाले, ' आयर्टनचं स्पेलिंग एकच–बेन जॉईस ! '

मेजरसाहेबांचा तो उद्‌गार म्हणजे एक बॉंबस्फोटच होता. सर्वजण काही क्षण अवाक् होऊन उभे होते. पण तेवढ्यात आयर्टन ऊर्फ बेन जॉईस बाहेर आला आणि मग पुढल्या घटना फार त्वरेने घडल्या.

त्याला पकडण्यासाठी मॅकनॅब्सने उडी मारली. पण त्या आधीच बेन जॉईसने कंबरेचे पिस्तूल काढून गोळी झाडली होती. ती लॉर्ड एडवर्डच्या खांद्याला चाटून गेली.

लेडी हेलनने एक भयोद्‌गार काढला. सर्वांचे लक्ष आपल्या जखमी नेत्यावर खिळले आणि त्यामुळे बेन जॉईसला तिथून सटकायला संधी मिळाली.

' चला, आपण पुढच्या प्रवासाला निघू या ' मलमपट्टी केलेल्या आपल्या उजव्या खांद्यावर हलकेच हात फिरवीत लॉर्डसाहेब म्हणाले. ' मला तसं फार लागलेलं नाही. '

' हो ना ! नाहीतर तो दुष्ट पुन्हा आपल्याला सतवायला येईल. ' मेरी ग्रँट म्हणाली, ' पण मेजरकाका, तुम्हाला त्याच्याबद्दल संशय केव्हा आला हो ? '

' काल रात्री ! तो एकटा नाही. त्याचे पाचसहा साथीदार आपला पाठलाग करीत आले आहेत. रात्री मी त्यांचं बोलणं ऐकलं तेव्हा मला कळलं की हा आयर्टन म्हणजेच तो पळालेला कैदी बेन जॉईस. बुडलेल्या ' ब्रिटानिया 'वरचा माल त्याने लुटला, त्यातच त्याला कागदपत्रेही मिळाली. '

‘ रात्री कळलं ? आणि तरी तुम्ही सकाळपर्यंत बोलला नाहीत ? ’

‘ कारण मला घबराट उडवायची नव्हती ! ’ मेजर मॅकनॅब्स म्हणाले.

‘ पण–पण ते साथीदार आपला सतत पाठलाग करीत होते आणि तरी आपल्याला इतक्या दिवसांत कळलं नाही ? ’

‘ कारण ते अंतर राखून येत होते. आपला माग काढण्यासाठी त्यांनी काय युक्ती योजली होती, माहीत आहे ? ’

‘ काय ? ’

‘ सुरुवातीला क्लोव्हर वनस्पतींचं रान आपल्याला लागलं आठवतं ? ’

ते सर्वांना चांगलेच आठवत होते. क्लोव्हरचा उग्र वास त्यांच्या नाकात भरला होता.

‘ आयर्टनने जनावरांना नाल ठोकून घेतले तेव्हा आत क्लोव्हरची पानं भरली होती. त्यामुळे ते रान संपल्यावर तो वास हुंगत या चोरांनी आपला माग काढला ! ’

‘ कमाल आहे ! पण–पण–आता आपण काय करावं ? ’

‘ मेलबोर्नला ताबडतोब चिठ्ठी पाठवावी हे बरं. ’

‘ पण ती पोचवणार कोण ? ’

‘ मी पोचवीन ! ’ खलाशी मरे ताडकन उठून म्हणाला, ‘ द्या लिहून चिठ्ठी ! ’

‘ शाबास ! ’ लॉर्डसाहेब म्हणाले. ‘ मात्र माझा हात दुखतो आहे. पॅगानेल, मी मजकूर सांगतो तो लिहून घेता का ? ’

पॅगानेल तंबूत पडलेले एक जुने रद्दी वर्तमानपत्र वाचीत बसला होता– ‘ न्यूझीलंड गॅझेट. ’ त्याने चिठ्ठी लिहून घेतली ती अशी होती.

‘ डंकन बोटीचे ॲक्टिंग कमांडर मि. टॉम ऑस्टिन यांस : हे पत्र पाहाताच ‘ डंकन ’ बोट मेलबोर्न बंदरातून हलवून पूर्वेकडे न्यावी.

३७ व्या अक्षांशावर थांबून आमची वाट पाहावी.– लॉर्ड एडवर्ड ग्लेनर-व्हॅन यांच्या हुकुमावरून. '

भल्या पहाटे मरे ही चिठ्ठी घेऊन घोड्यावर स्वार होऊन निघाला तेव्हा पाऊस पडत असूनही सर्वांनी जागे होऊन त्याला निरोप दिला. मरे हा अत्यंत बेडर, शूर पुरुष होता. पण ...

पाचदहा मिनिटांतच जंगलातून गोळीबाराचे आवाज निघाले; आणि कोणाची तरी किंकाळी कानावर पडली.

लॉर्ड एडवर्ड नि मेजर मॅकनॅब्स यांनी चपापून एकमेकांकडे पाहिले. मग दोघेही धावत जंगलात घुसले. खलाशी मरे घायाळ होऊन एका डबक्यात पडला होता. त्याच्या कंबरेत गोळी लागून झालेल्या रक्तस्रावाने पाण्याला लाल कळा आली होती.

दोघांनी त्याला उचलून तंबूत आणले. सुदैवाने कातडी कंबरपट्ट्यात गोळी घुसल्यामुळे झालेली जखम तीव्र नव्हती. तो लवकरच उठून बसला अन् म्हणाला, ' मी जंगलात शिरतो न शिरतो तो मला माणसांची कुजबूज ऐकू आली. आयर्टन – किंवा बेन जॉईस – त्याचा आवाज मी तेव्हाच ओळखला. तो आपल्या साथीदारांना सांगत होता – तुम्ही ताबडतोब जाऊन किनारा गाठा. टूफोल्डच्या अलीकडचं आपलं ठरलेलं ठिकाण. मी अगोदरच मेलबोर्नला जाऊन डंकन गाठतो. कप्तानाला लॉर्ड एडवर्डची चिठ्ठी दाखवून मी जहाजावर चढेन. चिठ्ठी मिळाली नाही तरी तोंडी निरोपसुद्धा मला पचेल असं वाटतं. तुमचं ठिकाण आलं की जहाज थांबवून मी तुम्हाला वर घेईन. मग काय – सगळं आपलंच राज्य आहे ! '


' बाप रे ! ! म्हणजे डंकन बोट ताब्यात घेण्याचा डाव आहे यांचा ! ' लॉर्ड एडवर्ड विचार करीत म्हणाले, ' आता वेळ घालवण्यात अर्थ नाही. आपण ताबडतोब निघू या ! '

पॅगानेल म्हणाला, ' आपल्याला अगोदर स्नोई नदी लागेल. तिच्यावरचा छोटा पूल ओलांडला की कसंतरी करून आपण किनाऱ्यावरचं मार्लो बंदर गाठू. तिथून आपल्याला मेलबोर्नकडे तार करता येईल. '

या खेपेचा त्यांचा प्रवास जास्तच कष्टाचा होता. हवा पावसाळी होती. जिकडे तिकडे चिखल झालेला होता. बैल एकच शिल्लक, त्यामुळे गाडीत कोणालाही बसणे शक्य नव्हते. सामान तेवढे आत भरून हेलन आणि मेरी यांच्यासह सर्वांना पायी चालावे लागले.

थकलेभागलेले हे पथक जेव्हा स्नोई नदीवरच्या केम्पल पीयर या धक्क्यावर पोचले, तेव्हा त्यांना खरोखरीच धक्का देणारे दृश्य दिसले. पावसाच्या पाण्याने दुथडी वहात असलेला हा प्रवाह ओलांडायचा कसा ? कारण याही पुलाची भग्नावस्था झालेली ! बेन जॉइस कंपनीने पूल उडवून लावला होता.

पुन्हा मंडळी नदीकाठी डेरेदाखल ! तराफे बांधणे भाग होते. त्यात दोन दिवस निघून गेले.



शेवटी तराफ्यावर बैलासकट सर्व सामान लादून आणि स्वतःही स्वार होऊन त्यांनी बांबू हातात घेतले आणि तराफा पाण्यावर लोटला. तो

जेमतेम पैलतीर गाठतो न गाठतो तो एका भोवऱ्यात सापडला. सर्वच्या सर्व शिधासामग्री पाण्यात वाहून गेली. बैल कोलमडला अन् भोवऱ्यात गिरक्या खात दिसेनासा झाला. एकमेकांना कवटाळून बसलेली माणसे तेवढी कशीबशी काठाला लागली.

जवळची सर्व शस्त्रे वाहून गेली होती. फक्त मेजर मॅकनॅब्सची बंदूक सुरक्षित राहिली होती.

जवळच डेलीगेट नावाचे गाव होते. तिथे त्यांना घोडागाडी मिळाली; आणि पुढचा प्रवास त्यांनी त्वरेने पार पाडला.

मार्लो बंदरात तार ऑफिस होते. तिथून लॉर्ड एडवर्डनी मेलबोर्नला आपल्या बोटीवरचा अधिकारी ऑस्टिन याला तार धाडली.

दोन तासांनी तारेचे उत्तर आले. पण ऑस्टिनकडून नाही. मेलबोर्न बंदराच्या अधिकाऱ्यांकडून. त्यात लिहिले होते, 'डंकन बोटीने आज सकाळी बंदर सोडले. कुठे जाण्यासाठी ते कळलेले नाही.'

झालं ! सारे परिश्रम पाण्यात गेले. 'डंकन' आगबोटही डाकूंनी पळवून नेली. ती ताब्यात घेताना काय काय क्रूर कर्मे त्यांनी केलां असतील, किती खलाशांना कंठस्नान घातलं असेल, देव जाणे !

आणि कॅप्टन ग्रँटबद्दल तरी आतापर्यंत काय कळलं आहे ? काही नाही. जिकडे तिकडे नन्नाचा पाढा ! मग त्यांचा शोध तरी आणखी किती काळ अन् कुठे कुठे करायचा ? त्यापेक्षा झालं हे पुष्कळ झालं— इथूनच स्कॉटलंडला परतलेलं काय वाईट ? मेलबोर्न बंदरातून हव्या तेवढ्या बोटी इंग्लंडकडे जात असतात. सहज मिळेल एखाद्या बोटीवर जागा !

अतिशय नाइलाजाने लॉर्ड एडवर्ड या निर्णयाला आले. ग्रँट बहीण-भावंडांची दारुण निराशा झाली होती. त्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती, की आपले वडील जिवंत आहेत आणि कॅप्टन मॅंगल्स नि पॅगानेल या दोघांनी जेव्हा आपलेही तसेच मत असल्याचे सांगितले तेव्हा त्यांची

मने कृतज्ञतेने भरून आली. पण इतरांच्या मते हे केवळ स्वप्नरंजन होते आणि त्यावर विसंबून हा खेळ पुढे चालू ठेवणे म्हणजे वेडेपणा झाला असता.

शेवटी मायभूमीला परतण्याचा ठराव सर्वांना जड अंतःकरणाने संमत करावा लागला.

# ५

## ‘ मॅक्वायर ’ बोटीवर

दुसऱ्याच दिवशी ‘ मॅक्वायर ’ नावाची आगबोट मेलबोर्न बंदरातून निघून उत्तर न्यूझीलंडला जाणार होती अन् मग तडक इंग्लंडची वाट धरणार होती. तिच्यावर ही मंडळी चढली.

‘ मॅक्वायर ’ बोट गुलामांचा व्यापार करीत असे, त्यामुळे तिचा खलाशीवर्ग रासवट नि आडदांड वृत्तीचा होता. पण या गोष्टीकडे दुर्लक्ष करून आमचे प्रवासी त्या बोटीतून निघाले होते. पण दुर्लक्ष केल्याचा घोर परिणाम लवकरच त्यांना भोगावा लागला.

‘ मॅक्वायर ’ वरचे कप्तानापासून ते झाडूवाल्यापर्यंत एकजात सर्वच कर्मचारी दारूबाज होते. जहाज सुटल्याला एक आठवडा लोटला आणि त्यांची तळघरात मैफल भरली. वर सुकाणूकडे किंवा यंत्रघराकडे पुन्हा पुन्हा लक्ष द्यायला हवे होते. तेवढी कुणालाही फुरसत नव्हती ! त्यातून कॅ. मॅंगल्स अन् त्यांचे खलाशी जेव्हा आपण होऊन कामाला लागले तेव्हा तर आळशावर गंगा आल्यासारखेच झाले ! मॅक्वायरचा तमाम

खलाशी वर्ग झिंगून पडला !

'मजा आहे झालं !' कॅ. मॅंगल्स म्हणाले. 'ही माणसं आहेत की जनावरं ?' – आणि मग त्यांची नजर आकाशाकडे गेली. त्यांनी एकदम डेकवर येऊन आरडाओरडा सुरू केला – 'वादळाची चिन्हं दिसताहेत – सावधान ! – अरे, कुणी तरी डोलकाठीवरचं शीड गुंडाळा ! ते मूर्ख लोक काही करायचे नाहीत ! आपल्यालाच आता जहाज संभाळायला हवं !'

आकाशातून काळ्या ढगांची फौज चाल करून येत होती. अकस्मात वारा जोराचा सुटला होता. लाटांची खळबळ वाढली होती.

आणि मग झंझावाती वादळाने बोटीला झपाटले. पर्वतप्राय लाटा उसळू लागल्या. बोट डळमळायला लागली. अंधार पडला तेव्हा वादळाला अधिकच जोर चढला होता.

'या तुफानी माऱ्याला जहाज तोंड देऊ शकेल असं वाटत नाही !' कॅ. मॅंगल्स म्हणाले. 'त्याची शंभर वर्षं भरल्यासारखी आहेत. पण या रात्रीच्या काळोखात आपण काही करू शकत नाही. सकाळ झाल्यावर पाहू !'

ती काळरात्र कशीबशी निघून गेली. कोणाचाही डोळ्याला डोळा लागला नाही.

रात्रभर वादळाचे थैमान चालू होते. सकाळी ते ओसरले. वारा पडला आणि मग समुद्र एकाएकी शांत झाला. पण वादळाने बोटीचे भयंकर नुकसान केले होते. लाटांबरोबर हिंदकळणारे जहाज कुठल्यातरी किनाऱ्याकडे जाऊन तिथल्या रेताड खबदाडीत रुतून बसले होते. तळमजला फुटला असून त्यात पाणी भरले होते.

पॅगानेल दुर्बिणीतून पाहात होता. त्याला कॅ. मॅंगल्स म्हणाले, 'बघितलंस ना ? न्यूझीलंडच्या किनाऱ्यालगत आलोत. ऑकलंड बंदर इथून दूर नसणार. या दळभद्र्या बोटीचा आपण आज त्याग करू अन्

बोटीवरच्या होडीत बसून किनारा गाठू. पुढे ऑक्लंडपर्यंत पायी जाऊ — एक दो—एक दो— '

थोडा आहार करून त्यांनी आवराआवर केली आणि मेजरसाहेब डेकवरची होडी काढण्यासाठी गेले.

पाहतात तो होडी जागेवर नाही!—आणि झिंगून पडलेले 'मॅक्वायर' चे खलाशी पण जागेवर नाहीत!

सर्वांच्याच अंगाचा क्रोधाने भडका उडाला. पण नुसते जळफळून काही उपयोग नव्हता. पुन्हा एखादे वादळ होण्याचा संभव असल्यामुळे शक्य तेवढ्या त्वरेने ते बुडणारे जहाज सोडून जाणे आवश्यक होते. बोटीच्या मोडक्या फळ्या जोडून त्यांनी एक तात्पुरता तराफा बनवला आणि वर एक काठी उभी करून शीड फडकावले. मग त्या तराफ्यावर बसून मंडळी किनाऱ्याकडे निघाली.

आणि वाटेतच त्यांना ती बोटीवरची होडी उपडी होऊन तरंगत आलेली भेटली.

'ते महामूर्ख दारुडे शार्कच्या भक्ष्यस्थानी पडलेले दिसतात.' कॅ. मँगल्स पुटपुटले. 'आता परमेश्वरच त्यांच्या आत्म्यास शांती देवो!'

'रात्र वरी गेली. पण हे नवीन काय संकट येतंय?' रॉबर्ट नदीकडे पाहात म्हणाला.

उत्तर न्यूझीलंडच्या दक्षिण किनाऱ्यावर उतरल्यापासून दोन दिवस मंडळींनी उत्तर दिशेने सतत पायपीट केली होती. अतिरम्य वनश्रीने नटलेल्या दऱ्याखोऱ्यांतून त्यांचा प्रवास झाला होता आणि तरी आता त्यांना थकल्यासारखे वाटत होते. ऑकलंडचा अजून पत्ता नव्हता! आणि आता हा पोरगा नव्या संकटाची काय भाषा करत होता?

रॉबर्टचे उद्गार ऐकून नदीकडे धावलेल्या पॅगानेलने तिथल्या उंच खडकाळ काठावरून डोकावून पाहिले.

एक लांबच लांब चिंचोळी नाव त्यांच्या दिशेने येत होती· आत पंचवीस-तीस सशस्त्र रानटी लोक बसलेले होते; आणि त्यांच्यातले सात-आठजण मोठ्या वेगाने वल्ही मारीत होते. कमरेपासून वर सर्व शरीर उघडे, हातात भाले, गळ्यात लहान लहान हाडकांच्या माळा अन् डोईला एखादे पीस खोवलेले असा त्यांचा अवतार होता.

' माओरी लोक ! ' पॅगानेल उद्गारला.

नाव एका सोयिस्कर काठाला लागली अन् आतले लोक जमिनीवर उतरले. त्यांचा पुढारी तंबूकडे आला अन् मोडक्यातोडक्या इंग्रजीत गुर-गुरला, ' यू इंग्लिश ? '

' येस् ! ' लॉर्ड एडवर्ड म्हणाले, ' आम्ही इंग्लिश लोक आहोत, पण संकटात आहोत. '

' मी किंग काई–कुमा ! ' असे म्हणत त्याने एक हात वर केला, तशी त्याच्या लोकांनी या मंडळींना गराडा घातला; अन् त्यांच्या अंगावर भाले रोखले.

' तुम्ही माझे कैदी आहात. ' जंगलाच्या राजाने त्यांना बजावले. ' इंग्लिशांनी आमचा महान् पुजारी थोआग्या कैद केला आहे, त्यांची सुटका होईपर्यंत आम्ही तुम्हाला ओलीस ठेवणार ! '



रानटी लोकांपुढे कोणताही युक्तिवाद करणे व्यर्थ होते. त्यांना गिरफ-दार होणे भाग पडले, त्यानंतर नदीतून कितीतरी दिवस त्यांचा प्रवास चालला होता. त्यांना त्यांनी त्रास मात्र दिला नाही, कारण आपल्या ओलीस कैद्यांना त्यांना सुखरूप ठेवायचे होते.

नदी म्हणजे एक प्रचंड खोल घळ होती. तिचे दोन्हीकडचे काठ म्हणजे जणू दगडी तट वाटत होते. तिथला भूप्रदेश म्हणजे डोंगर होते. त्यातल्या एखाद्या डोंगराचे शिखर रात्रीच्या वेळी प्रज्वलित झाल्यासारखे दिसे.

' ज्वालामुखी आहेत ते. ' पॅगानेलने माहिती दिली. ' काही सुप्त, काही मधून मधून उफाळणारे. '

शेवटी मंडळी एका माओरी खेड्यात येऊन दाखल झाली. हे खेडे एका दरीत वसलेले असून दरीच्या वरच्या अंगाला माओरी लोकांचा एक भुईकोट किल्ला होता.

कैदी पाहुण्यांना पाहून गावकऱ्यांनी त्यांना वेढले अन् त्यांच्यावर शिव्याशापांचा वर्षाव केला. शेवटी त्यांना एका भक्कम खोपटात बंद केल्यावरच त्यांची या अत्याचारातून सुटका झाली.

तिथे त्यांना काई-कुमा आपल्या लवाजम्यासह येऊन भेटला. ' मेसेंजर कम. ' तो म्हणाला. ' आत्ताच एक जासूद आला. त्याने दुष्ट खबर आणलीय. महान पुजारी थोआय्याला इंग्लिशांनी गोळी घालून ठार केले. मी त्याचा बदला घेणार. तुम्हाला सर्वांना मी बळी देणार ! '

' फक्त हिला नाही. ही माझी राणी होणार ! या कारातेते राजाची. ' दुसरा एक लाल पिसे मिरवणारा नेता पुढे होऊन म्हणाला आणि त्याने हेलनचा हात धरण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले.

त्याच क्षणी गोळीबार झाला अन् कारातेतेचे शरीर कोलमडून खाली पडले. लॉर्ड एडवर्डच्या हातातल्या पिस्तुलातून अजूनही धूर निघत होता.

हा भयंकर प्रकार पाहताच काही क्षण सर्वजण स्तब्ध उभे होते. मग

माओरींनी भाले उगारून आमच्या मंडळीवर हल्ला चढवला. पण काई–कुमाने हाताचा इषारा करून त्यांना थोपवले.

‘ टाबू ! – टाबू ! ’ तो ओरडला, ‘ काराततेच्या दफनविधीपर्यंत टाबू.’

‘ टाबू ’ हा एक जादूचा शब्द आहे. तो आता इंग्रजी भाषेत रूढ झाला असला, तरी मुळात जंगलाच्या आदिवासी भाषेतला तो शब्द आहे. एखाद्या कृतीला बंदी घालायची असली की माओरी लोक तो शब्द उच्चारीत.

वा. क्र
विषय

# ६

## कैदेतून सुटका

पण ही बंदी काई–कुमाने का घातली ? पाहुण्यांकडून साप मारला गेला–आपला प्रतिस्पर्धी राजा जगातून नाहीसा झाला याबद्दल त्याला मनातून समाधान तर वाटत नव्हते ना ? लॉर्ड एडवर्ड अन् मेजर मॅकनॅब्स यांनी परस्परांकडे पाहिले ते तरी त्या शंकेने.

पण लॉर्डसाहेबांनी केलेल्या गोळीबाराचा परिणाम मात्र फार कठोर झाला. कैद्यांना आता एका अंधारी गुहेत कोंडण्यात आले; आणि गुहेच्या तोंडाशी सशस्त्र पहारा बसला.

'देवा–देवा ! आता कसं होणार आपले ?' हेलन उद्गारली. तिचे समाधान करण्यासाठी लॉर्ड एडवर्ड हळूच म्हणाले, 'काळजी करू नकोस. देवाची प्रार्थना कर. आपल्या नि रॉबर्ट पॅगानेलच्या रक्षणासाठी.'

'रॉबर्ट–अन पॅगानेल !'

'होय. ते आपल्यात नाहीत. मघाच्या गडबडीचा फायदा घेऊन ते

पसार झालेत हे तुझ्या लक्षात आलं नाही का ? '

हेलनच्या चेहऱ्यावरचे आश्चर्य अंधारात कोणाला दिसले नाही. पण मेरी कुजबुजली, ' माझ्या ते केव्हाच लक्षात आलंय. '

' ठक्-ठक् ! ठक्-ठक !'

कसला आवाज झाला हा ?

मेरी नि हेलन ताडदिशी उठून बसल्या. गुहेच्या त्या कैदखान्यात त्यांना झोप येणे शक्य नव्हते. तसे म्हटले तर त्यांचा थकवा गेलेला होता. कारण एक रात्र नि एक दिवस त्यांना या कैदखान्यात विश्रांती मिळाली होती. त्यांना कसले तरी उग्र मांसाचे जेवणही खायला मिळाले होते.

आता मध्यरात्र उलटली होती. या दोघी जाग्या असल्या तरी बाकीच्या मंडळींना झोपा लागल्या होत्या आणि तेवढ्यात तो आवाज झाला–' ठक्-ठक् ! '

मेरीने चमकून मागच्या भिंतीकडे पाहिले. कारण आवाज तिकडून आला होता. तिने कॅ. मॅंगल्सना हलवून जागे केले.

' कॅप्टनसाहेब उठा ! ते बघा बाहेरून कुणीतरी ठोकतंय ! '

कॅप्टनसाहेब उठले, बाकीची माणसेही उठली. सर्वजण कान टवकारून त्या भिंतीकडे पाहू लागले.

' ठक्-ठक् ! ' आवाज सारखा चालूच होता. आणि तो नुसता हातांनी ठोकल्याचा नव्हता. पहार-कुदळ यांसारख्या एखाद्या हत्याराने टोकरण्यासारखा तो आवाज होता.

आणि लवकरच भिंत फुटली. भगदाड पडले अन त्या भगदाडातून एक हात आला आणि मग एक डोकेही आत आले.

' रॉबर्ट ! ' ओठातून उद्गार बाहेर पडतानाच कॅप्टन मॅंगल्सनी तिच्या तोंडावर हात दाबला. तिच्याबरोबर बाकीची मंडळीही अवाक् होऊन पाहात राहिली.

'पलीकडच्या गुहेत मी लपून बसलो होतो.' रॉबर्ट घाईघाईने पुटपुटला. 'काल या लोकांच्या तावडीतून सुटल्यावर मला ती रिकामी गुहा सापडली. अशा कितीतरी गुहा या डोंगरात आहेत–'

'आणि पॅगानेल ?'

'मला माहीत नाही. पण चला, आधी इथून बाहेर पडा.'

लगेच एकामागून एक सर्व कैदी त्या भगदाडातून बाहेर पडले. दुसऱ्या गुहेतूनही बाहेर निघाल्यावर रॉबर्ट म्हणाला, 'चला माझ्या मागून.'

रॉबर्ट वाट काढीत पुढे चालला अन् त्याच्यामागून हे सर्व चालले. पहाट व्हायला आली होती, पण अजून चांगले उजाडले नव्हते. काळोखच होता. नशीब त्यांचे की पाऊस पडत नव्हता.

रानझुडपातून मार्ग काढीत ते तो लहानसा डोंगर उतरून खाली गेले मात्र, वर आरडाओरडा झालेला त्यांच्या कानांवर आला. तिकडे एकच गडबड उडाली होती. कैदी पळाल्याची बातमी जाहीर झाली होती. जंगली लोक त्यांचा पाठलाग करीत होते. खूप धावपळ करीत त्यांनी डोंगराच्या पायथ्याला वळसा घातला; अन् ते थांबले.

'बाई–बाई ! माझ्या तर पायाचे तुकडे पडले ! मला आणखी एक पाऊल टाकवणार नाही !' हेलन कळवळली.

'आणि हे काय ? आपण पुन्हा होतो तिथेच आलोत की !' मेरी उद्गारली.

'नाही. हा दुसरा डोंगर आहे.' रॉबर्ट वर पाहात म्हणाला. 'याच डोंगराच्या माथ्यावर काल त्या लोकांनी कारा-तेतेला पुरलं अन् त्याची समाधी बांधली. त्याची एकट्याची नाही. त्याच्या राणीची नि गुलामांची पण !'

'म्हणजे ?'

'त्यांना त्यांनी ठेचून ठेचून मारलं ! राजेसाहेबांना स्वर्गापर्यंत सोबत

हवी ना, म्हणून ! '

' अयाई ग ! मला ऐकवत नाहीत असल्या गोष्टी ! ' हेलन कळवळली.

" पण मी त्या घडलेल्या डोळ्यांनी पाहिल्या आहेत. ' रॉबर्ट म्हणाला. ' पण चला ! आपल्याला हा डोंगर चढून वर गेलं पाहिजे. '

' हा डोंगर ? – हा समाधीचा डोंगर ? तो कशाला ? '

' कारण हा पवित्र डोंगर आहे. इथे जायला कुणालाही परवानगी नाही. काल मी पाहिलं तर जंगली शिपाई इथून लोकांना हटवीत होते. सुदैवाने इथे पहारा दिसत नाहीये. आपण पटापट चढून वरच्या झाडीत आसरा घेऊ या. '

ते लपतछपत डोंगर चढू लागले. डोंगराच्या पायथ्यालगत गलका होत असल्याचे आता स्पष्ट ऐकू आले. आणखी काही वेळ गेला आणि मग –

' आलो की आपण माथ्यावर ! ' रॉबर्ट थबकून म्हणाला. ' आता पुढे काय ? '

' पुढे इकडे यायचं. दुसरं काय ? ' त्यांच्या कानावर हे शब्द पडले आणि प्रत्येकाचे पाय जमिनीला खिळल्यासारखे झाले. जो तो दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहू लागला.

' पॅगानेल !... हा नक्की पॅगानेल ! ' मेजर मॅकनॅब्स म्हणाले. ' पण कुठून बोलतेय ही वल्ली ? '

डोंगरमाथा गाठलेला असला तरी अजून एक शेंडुक शिल्लक होते -- बालेकिल्ला !

तोही चढून गेल्यावर, वल्ली कुठून बोलत होती याचा उलगडा झाला. त्यांच्या पुढ्यात अनेक बांबू नि ओंडके खांबासारखे उभे करून एक कुसू तयार केले होते. काही खांबांच्या टोकांवर लाकडी मुखवटे खोवलेले होते. तर काहींच्या टोकांवर बैलांची मुंडकी होती : ... आणि पलीकडे एका कातळावर बसून पॅगानेलसाहेब दोन्ही हातांनी धरलेले काहीतरी चावून

चावून खात होते. कणीस असेल, किंवा मटनाचा तुकडा! साहेबांनी अंगावर पांघरला होता झिपऱ्या काठाचा माओरी झगा.

'या–पुढे या!' पॅगानेल म्हणाला, 'ही मरहूम राजे कारा-तेते यांची समाधी आहे. त्यांचे जवळचे नातेवाईकही त्यांच्या प्रेमाखातर समाधिस्थ झाले आहेत. त्यांना थंडी वाजू नये म्हणून इथे कपडे ठेवलेले आहेत आणि त्यांच्या आत्म्यांना भुकेलं वाटू नये म्हणून ठेवलेला खाना पोटात घालण्याचे भाग्य मला लाभले आहे. या – खुशाल या, अन फराळ करा. दुसरं कुणी वर येईल अशी भीती बाळगू नका. एकाही माओरीची छाती नाही वर येण्याची!'

पॅगानेलचे सोबती त्याच्याकडे डोळे विस्फारून पाहात राहिले. फराळ झाल्यावर तोंड पुशीत तो म्हणाला, 'तो पलीकडचा धोंडा पाहिलात? जवळ जाऊन पाहा कसा डळमळतो आहे. त्याच्या खाली उष्णता आहे. ज्वालामुखीचं विवर आहे तिथे! आपण तो धोंडा सरकवू शकलो तर या डोंगरावर एक भुसनळी त्या जादूमुळे उडेल आणि भयभीत झालेले माओरी आपल्याला शरण येतील!'

'काय सांगतोयस, पॅगानेल?'

'अगदी खरं तेच बोलतोय, लॉर्डसाहेब!' पॅगानेल जागचा उठत म्हणाला, 'या, सर्वजण हात लावा!'

धोंडा प्रचंड होता आणि गरम. तरी सर्वांनी हातभार लावल्यावर तो जागचा हलला. धोंड्याच्या खालून वाफा येऊ लागताच सर्व मागे हटले. धोंड्याचे वरचे अंग तितके तापलेले नव्हते. त्यालाच रेट देऊन त्यांनी तो ढकलण्याचा प्रयत्न केला.

'है हो – है हो –'

धोंडा एकदाचा हलला अन कलंडला. मग तो गडगडत डोंगराच्या पायथ्याकडे गेला अन त्याच वेळी मोकळ्या झालेल्या विवरातून एक अग्निरेखा बाहेर आली. तिचा लवकरच लोळ बनला...

डोंगराच्या पायथ्याशी एकच गडबड उडाली. हातात भाले घेतलेले पहारेकरी हा चमत्कार पाहून दूर पांगले अन् बोंबलत सुटले.

इकडे जागृत झालेल्या ज्वालामुखीतून आता लाव्हारसाचा लोंढा वाहू लागला होता. मधून मधून तप्त खडकाच्या कपच्या वर उडत होत्या.

आमची संशोधक मंडळी केव्हाच मागे हटली होती आणि दूर अंतरा-वर उभे राहून हा चमत्कार पाहात होती.

' पळताहेत ! – खालचे लोक पळताहेत ! ' लॉर्ड एडवर्ड म्हणाले.

' मग आपणही पळू या–चला ! या धुमश्चक्रीत आपल्याकडे कुणी लक्ष देणार नाही ! '

पॅगानेल पुढे अन् बाकीचे एकेकजण मागे अशी ओळ करून ते त्या धगधगत्या डोंगरावरून खाली उतरले. त्या वेळी गावात एकच हलकल्लोळ उडाला होता.

' तिकडे लक्ष देऊ नका !—पळा–पळा ! या नरकुंडापासून शक्य तेवढे दूर जाऊ या ! कारण एकदा हे लोक सावध झाले की आपल्याला क्षणभरही जिवंत ठेवणार नाहीत ! ' लॉर्ड एडवर्ड ओरडत होते. ' हेलन–मेरी ! तुम्ही दमलात की सांगा. आम्ही तुम्हाला उचलून घेऊ···अहं ! मागे पाहू नका ! लोंढा त्या बाजूला वळला आहे इकडे नाही ! '

डोंगर-दऱ्या तुडवून सखल जमिनीपर्यंत पोचायला त्यांना संपूर्ण दोन दिवस लागले. अतिशय खडतर प्रवास करावा लागला. पण अखेरीस तो संपला.

' समुद्र दिसतो आहे ! ' पॅगानेल म्हणाला. ' सुटलो आपण ! कारण या भागात ब्रिटिशांचा अंमल आहे ! आणि तिथे तर कुणाची तरी होडी नांगरून पडली आहे !–चला चला ! '

पण कसला अंमल अन् कसलं काय ? एकही माणूस दृष्टिपथात नव्हता. आणि बाजूच्या घळीतून जो ओढा वाहात येऊन समुद्राला मिळाला होता, त्यातून जेव्हा एक हत्यारबंद माओरींनी भरलेली नाव

बाहेर आली तेव्हा यांचे धाबे दणाणले.

'चला त्या होडीत चढा!' लॉर्ड एडवर्ड ओरडले. आणि त्यांचे अनुयायी लगेच त्या मोकळ्या पडलेल्या होडीत चढून बसले. 'मरायचंच असेल तर पाण्यात पडून मरू!'

होडी कुणाची का असेना – तिच्या दोऱ्या सोडून आमच्या प्रवाशांनी ती ताब्यात घेतली आणि सपाट्याने वल्ही मारावयास सुरुवात केली.

म. ग्रं. सं. ठाणे ... शाखा.
दा. क्र. 2038 ... 117166
विषय बा.वा.

# ७

# आयर्टनची कबुली

होडी उत्तम होती. तिने द्रुतगतीने पाणी कापले आणि थोड्या वेळाने —

' क्षितिजावर शीड दिसतं आहे !...जहाज ! ते जहाज गाठू या आपण ! ' मेजर मॅकनॅब्स ओरडले.

' मेजरसाहेब, ते आलतूफालतू जहाज नाही. ' दुर्बिणीतून पाहात असलेले लॉर्ड एडवर्ड संथपणे म्हणाले. ' आपलं नशीब भलतं विलक्षण दिसतं आहे !

' ते कसं ? '

' कारण ते जहाज म्हणजे डंकन आगबोट आहे ! '

' डंकन ! ' आश्चर्याचा पाहिला भर ओसरल्यावर हेलन म्हणाली. ' पण तिचा आपल्याला काय उपयोग ? डंकन तर डाकूंच्या ताब्यात आहे ना ? '

' खरंच की ! ' लॉर्डसाहेब म्हणाले. ' ते मी विसरलोच ! पण त्या

जंगल्यांच्या तावडीत सापडण्यापेक्षा डाकूंनी पकडलेलं बरं—'

हे बोलणे चालू असताना होडी आगबोटीच्या पुष्कळच जवळ आली होती. दुर्बिणीतून पाहात असलेले कॅ. मँगल्स ओरडले, ' महान आश्चर्य ! डेकवरचे लोक हात हलवून आपलं स्वागत करताहेत!...माय गुडनेस ! हा तर टॉम ऑस्टिन दिसतोय ! '

' गॉड इज ग्रेट ! ' हेलन दोन्ही हात जोडून उद्गारली.

' हा काय प्रकार आहे, ऑस्टिन ? डंकन अजून तुझ्या ताब्यात आहे ? – आणि तू इकडे न्यूझीलंडकडे कसा आलास ? ' सर्व मंडळी बोटीवर सुखरूपपणे चढल्यावर लॉर्ड एडवर्ड आपल्या दुय्यम अधिकाऱ्याला विचारीत होते.

' म्हणजे काय ? तुम्हीच आज्ञा दिली नव्हतीत का ?–३७° अक्षांशावर न्यूझीलंडच्या पश्चिम किनाऱ्याकडे जा. तिथे आमची वाट पाहा–म्हणून ? '

' कमाल आहे ! ' लॉडसाहेब म्हणाले. ' मी असा कधीच हुकूम दिला नव्हता ! '

' ओः गॉड ! ' पॅगानेल उद्गारला, ' आता आठवलं. माझाच वेंधळेपणा झाला तो ! लॉर्डसाहेब, तुम्ही मला चिठ्ठी लिहायला सांगितलीत ना, तेव्हा तंबूत एक जुनं वर्तमानपत्र पडलं होतं–न्यूझीलंड गॅझेट नावाचं ! तो मथळा मी वाचीत होतो. आणि त्यामुळे मी चिठ्ठीत चुकून ' न्यूझीलंडकडे ' असे शब्द घातले ! '

' शाबास ! ' ऑस्टिन म्हणाला. 'त्यामुळे मी या बाजूला बोट आणली.'

' बरं झालं की ! ' हेलन हसून म्हणाली. ' कधी कधी वेंधळेपणाचा फायदा होतो तो असा. '

' आम्हाला आपलं वाटत होतं, की डंकन आयर्टन कंपूच्या हातात पडली. ' कॅ. मँगल्स म्हणाले, – ' बरंका ऑस्टिन, आयर्टन हा एक

बदमाश डाकू होता.'

'तो मेलबोर्नला तुमचं नाव सांगून बोटीवर चढला. ती त्याची थापच असावी. मला त्याच्याबद्दल पहिल्याने केव्हा शंका आली ? मी जेव्हा बोट न्यूझीलंडकडे न्यायला लागलो तेव्हा ! तो सारखा एकच सूर लावत होता – बोट टू फोल्डकडे घ्यायला सांगितलीय म्हणून. मी त्याचं ऐकलं नाही तेव्हा असा भडकला – असा भडकला – हातपाय काय आपटेलन्, झिंज्या काय उपटल्यान् ! पण मला तो डाकूबिकू वाटला नाही. पागल वाटला . आणि म्हणून मी त्याला ताबडतोब बोटीच्या तळघरात कोंडून ठेवलंय !'

'उत्तम केलंस !' कॅ. मॅंगल्स म्हणाले, 'आपण त्याचा नंतर समाचार घेऊ !'

आणि मग सर्व स्थिरस्थावर झाल्यावर आयर्टनला त्यांनी डेकवर आणले अन् त्याची चौकशी केली. तो पक्का बेरकी माणूस होता. त्याला आपल्या कृत्यांचा पश्चात्ताप झाल्याचे मुळीच दिसले नाही.

'इंग्लंडला गेल्यावर तुझ्यावर खटला भरू. जी शिक्षा होईल ती तुला भोगावी लागेल' अशी धमकी दिल्यावरही तो बधेना. त्याला शक्य तेवढी कडक शिक्षा व्हायला पाहिजे असे लॉर्ड एडवर्ड अन् कॅ. मॅंगल्सचे मत पडले. पण हेलन अन् मेरी यांनी त्याच्यासाठी दयेची याचना केली तेव्हा त्याला शिधासामग्रीसह एखाद्या निर्जन बेटावर सोडून देण्याचे त्यांनी कबूल केले. एवढे आश्वासन मिळाल्यावर त्याने जी हकीकत सांगितली ती अशी – 'ब्रिटानिया बोटीवर मी एक दुय्यम अधिकारी होतो. वाटेत कप्तानाशी माझा झगडा झाला. तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या पश्चिम किनाऱ्यावर पर्थ बंदराजवळ त्यांनी मला सोडून दिलं. तिथे तुरुंगातून टळेल्या कैद्यांशी माझी गाठ पडली आणि मी त्यांची एक टोळी बनवून चोऱ्यामाऱ्या करू लागलो !'

'ब्रिटानिया पुढे कुठे गेली ?'

'ते मला माहीत नाही. पण कॅप्टनसाहेबांचा बेत बोट न्यूझीलंडकडे नेण्याचा होता. नंतर केप हॉर्नला वळसा घालून ते इंग्लंडला परतणार होते.'

# ८

## अखेर बाबा भेटले

लॉर्डसाहेबांनी यानंतर एक बैठक घेतली. ते म्हणाले, ' न्यूझीलंडही आपण पायांखाली घातलं आहे. पण आपल्याला कॅप्टन ग्रँटचा पत्ता लागलेला नाही. अजूनही काही काळ आपण ३७° अक्षांशावरून जाणार आहो खरे, पण एकंदरीत आता आशेला फारशी जागा उरलेली नाही ! तेव्हा आपल्याला अखेर हात हलवीतच युरोपला परतणं भाग आहे. '

हे भवितव्य सर्वांनाच कळून चुकले होते; आणि त्यासाठी प्रत्येकाच्या मनाची तयारी झाली होती. रॉबर्ट आणि मेरी यांना मात्र या निर्णयामुळे तीव्र दुःख झाले. कारण अजूनही त्यांची मने त्यांना सांगत होती की आपले वडील जिवंत आहेत.

३७ व्या अक्षांशावरून डंकन धीमे धीमे पूर्वेला चालली होती. त्यांना वाटेत अनेक खडकाळ बेटे लागली; पण त्यांतले एकही त्यांनी पसंत केले नाही. एकतर बेटे अत्यंत रखरखीत निष्पर्ण अशी होती. किंवा त्यावर क्रूर रानटी लोक तरी रहात होते. अशा ठिकाणी कैद्याला सोडणे म्हणजे

अखेर उपाशी मरण किंवा तडकाफडकी देहान्ताची शिक्षाच झाली असती.

काही दिवस असा निष्फळ प्रवास केल्यानंतर ५ मार्चच्या संध्याकाळी त्यांना एक लहानसे पण निसर्गसुंदर बेट लागले. पॅगानेलने नकाशात पाहून सांगितले, 'याला भूसंशोधकांनी टॅबोर नाव दिलेलं आहे. इथे मनुष्यवस्ती अजिबात नाही.'

'ठीक आहे.' लॉर्ड एडवर्ड म्हणाले, 'आता काळोख पडत चालला आहे. उद्या सकाळी आपण याला टॅबोरवर सोडू.'

त्या रात्री मेरीला झोप आली नाही. ती उठून डेकवर फेऱ्या मारीत होती. सकाळी तिने सांगितले, 'मी रात्री कठड्याला टेकून उभी असताना मला एकाएकी वडिलांची हाक ऐकू आली...रॉबर्ट, तुला सांगते —ते नक्की बाबा होते. बाबा इथेच जवळपास कुठेतरी आहेत!'

हे बोलताना तिचे डोळे अश्रूंनी भरले होते. रॉबर्टलाही भावनावेग असह्य होऊन त्याने मान बाजूला वळवली.

कॅ. मॅंगल्सनी मेरीच्या खांद्यावर हात ठेवून तिचे कसेबसे समाधान केले.

पण थोड्याच वेळाने टॅबोरचा किनारा जेव्हा जवळ आला तेव्हा एक विलक्षण दृश्य दिसले.

तीन इसम किनाऱ्यावर उभे राहून निशाण हलवीत त्यांचे स्वागत करीत होते. रॉबर्ट नि मेरी यांची हृदये भरून आली. मेरीने दुर्बिण हिसकावून घेतली आणि ती डोळ्याला लावताच ती ओरडली, 'बाबा!— नक्की बाबाच आहेत ते!'

आता सर्व उतारू डेकवर जमा झाले. सर्वांच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

होडी पाण्यात सोडल्याबरोबर तीत पहिली पावले ठेवली ती रॉबर्ट— मेरी या बहीणभावंडांनी. आणि मग सर्व मंडळी किनाऱ्याकडे गेली.

रॉबर्ट—मेरी यांना त्यांचे वडील भेटल्यावर त्यांची अवस्था काय झाली असेल त्याचे—प्रिय बालमित्रांनो! तुम्ही कल्पनेनेच चित्र उभं करा.

कॅप्टन ग्रँटनी आपल्या मुलांना प्रेमालिंगन दिले आणि लॉर्ड एडवर्ड, मेजर मॅकनॅब्स, कॅप्टन मँगल्स नि पॅगानेल यांनी आपल्या शोधासाठी जे अपार कष्ट सोसले होते त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. असल्या धाडशी सफरीत न कुरकुरता सामील झाल्याबद्दल हेलनचेही त्यांनी कौतुक केले.

काही दिवस त्या सुंदर निसर्गसमृद्ध बेटावर घालवून मंडळी या नव्या तीन शिलेदारांना घेऊन इंग्लंडकडे परतली तेव्हा पहिल्या उतारूंपैकी एकाला त्यांनी मागे ठेवले होते हे सांगायला नकोच.

तो उतारू म्हणजे आयर्टन ऊर्फ बेन जॉईस.

टॅबोर बेटावर तो किती काळ एकटा राहिला, पुढे एखाद्या जहाजाने त्याला उचलले किंवा काय याच्याशी आपल्याला काही कर्तव्य नाही. पण भरपूर झाडे असलेल्या त्या बेटावर त्याचे हाल झाले नसतील एवढे निश्चित.

✤

म. ग्रं. सं. ... शाखा.
वा. क्र. 2036 ... 11/11/66
विषय 011.01
BVBK-0402037